रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १९७
www.ramprahar.com
◆ मंगळवार, ३ फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

नवी मुंबई विमानतळ आता २४ तास कार्यान्वित/२
समरभूमी उंबरखिंड येथे ३६५वा विजयोत्सव/५
आभा सोमणला ट्रॅक एशिया कपमध्ये दुहेरी सुवर्णपदक/८

## एअर इंडियाच्या विमानाचा मोठा अपघात टळला



**बंगळुरू** : एअर इंडियाच्या बोइंग ७८७-८ विमानात पुन्हा एकदा मोठा तांत्रिक बिघाड झाल्याचे समोर आले आहे. लंडनहून बंगळुरूला येणाऱ्या विमानातील 'फ्यूल कंट्रोल स्विच'मध्ये बिघाड झाल्याचे सोमवारी (दि. २) निदर्शनास आले, ज्यामुळे उड्डाण रोखण्यात आले. याची गांभीर्याने दखल घेत नागरी विमानवाहतूक संचालनालयाने (डीजीसीए) एअर इंडियाच्या ताफ्यातील सर्व विमानांचे फ्यूल स्विचची तपासण्याचे निर्देश दिले होते. यानंतर खबरदारी म्हणून सर्व विमानांची तपासणी करण्यात आली असून इतर कोणत्याही विमानात बिघाड आढळून आला नाही, असे एअर इंडियाने स्पष्ट केले. यापूर्वी अहमदाबादहून लंडनला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाला अपघात होऊन २६० जणांचा मृत्यू झाला होता. त्या अपघाताच्या चौकशीतही अशाच प्रकारचा तांत्रिक बिघाड समोर आला होता.

# विकासाची गती कायम राखण्यासाठी भाजप महायुतीच्या उमेदवारांना विजयी करा

## पनवेलच्या वडघर येथील सभेत लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप महायुतीच्या पनवेलमधील वडघर जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार सोनाली जितेकर आणि वडघर पंचायत समिती गणाच्या उमेदवार रंजना वास्कर यांच्या प्रचारार्थ रविवारी वडघर मुस्लिम मोहल्ला येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत ही सभा झाली.



या वेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी परिसराच्या सर्वांगीण विकासाचा मुद्दा अधोरेखित केला. भाजपच्या माध्यमातूनच या भागाचा कायापालट होत असल्याचे सांगत येणाऱ्या काळात विकासाची ही गती कायम राखण्यासाठी कमळ निशाणीसमोरील बटन दाबून भाजप महायुतीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

आमदार महेश बालदी यांनीदेखील मतदारांशी संवाद साधताना विकासाच्या राजकारणावर भर दिला. जात आणि धर्माच्या पलीकडे जाऊन केवळ विकासासाठी भाजपच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे. जनतेच्या प्रगतीसाठी आपण सदैव कटिबद्ध राहू, अशी ग्वाही त्यांनी या वेळी दिली.

या प्रचार सभेला भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, भाजप पनवेल पश्चिम मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ, शब्बीर कल्याणकर, बूथ अध्यक्ष मोहम्मद साठी, महिला मोर्चा तालुका उपाध्यक्ष समीना साठी यांच्यासह मजीद निगुडकर, अॅड.मेहबुब पटेल, मैनुद्दीन मानुल्ला, माजी सदस्य बशीर खान, रमेश ठाकूर, किशोर ठाकूर, अस्मल चोगले, गाव अध्यक्ष अनवर राऊत, अरबाज साठी यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हरित महाराष्ट्रासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत बैठक

**मुंबई : प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धन, हवामान बदलाशी लढा आणि ग्रामीण रोजगार निर्मिती या त्रिसूत्रीवर महाराष्ट्रातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी २०२६ ते २०३१ या कालावधीत तीनशे कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घ्यावा. वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमात या क्षेत्रातील तज्ज्ञ, स्वयंसेवी संस्था याच्याबरोबरच स्टार्टअपचा सहभाग घ्यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

प्रस्तावित हरित प्राधिकरण-३०० कोटी वृक्ष लागवड मिशनसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी सोमवारी (दि. २) आढावा बैठक झाली. त्या वेळी ते बोलत होते.

राज्यातील वनक्षेत्र ३३ टक्के करण्यासाठी मिशन मोडवर हा कार्यक्रम हाती घ्यावा. या कार्यक्रमाच्या समन्वयासाठी हरित महाराष्ट्र प्राधिकरण स्थापन करण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत सादर करावा. शासकीय विभाग, विविध संस्थाबरोबरच या विषयातील स्टार्टअपचा सहभाग या मोहिमेसाठी घ्यावा. स्टार्टअपची इकोसिस्टीम तयार करून रोजगार निर्मिती करता येईल, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

हरित महाराष्ट्र उपक्रमांतर्गत रोप उपलब्धतेनुसार पहिल्या वर्षात सुमारे २० कोटीपर्यंत वृक्ष लागवड हाती घ्यावी. यामध्ये बांबू, साग लागवड करण्यात यावी. यासाठी लागणारी रोपे तयार करण्यासाठी शासकीय नर्सरीबरोबरच खासगी नर्सरी, बचतगट यांचाही सहभाग घ्यावा. या उपक्रमातील सर्व शासकीय विभागाबरोबरच वन विभाग, नर्सरी यांना उद्दिष्टे ठरवून द्यावीत तसेच ग्रामीण भागात शेतकरी, युवा, महिलांचा सहभाग घ्यावा, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

या वेळी 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांनी या उपक्रमांचे सादरीकरण केले. बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्र्यांचे वरिष्ठ आर्थिक सल्लागार तथा मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, नगरविकास (२) विभागाचे अपर मुख्य सचिव के. एच गोविंदराज, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, मृद व जलसंधारण सचिव गणेश पाटील, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख) श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वन संरक्षक (सामाजिक वनीकरण) विवेक खांडेकर, महाराष्ट्र रिमोट सेन्सिग अप्लिकेशन सेंटरचे (एमआरएसएसी) संचालक श्री. कोलते आदी उपस्थित होते.



### असे आहे मिशन

या मिशन अंतर्गत राज्यातील विविध कृषी-हवामान पट्ट्यांनुसार स्थानिक परिसंस्थेला अनुरूप प्रजातींचीच लागवड करण्यात येणार असून गवताळ प्रदेश व दलदलींमध्ये वृक्ष लागवड न करता त्यांचे पुनर्संचयितीकरण केले जाणार आहे. या मिशनची अंमलबजावणी डिजिटल व उपग्रह-आधारित रिअल-टाईम निरीक्षण प्रणालीद्वारे होणार असून लागवड आणि वृक्ष जगण्याचा दर पारदर्शकपणे नोंदवला जाणार आहे. झाडे जिवंत असण्याचा दर, जंगलाची निर्मिती आणि रोपांच्या वाढीची नियमित तपासणी करण्यात येईल.

## जि.प., पं.स. निवडणुकीसाठी कर्मचाऱ्यांना सुट्टी

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील १२ जिल्हा परिषदा व त्या अंतर्गत १२५ पंचायत समित्यांमध्ये शनिवारी (दि. ७) मतदान आहे. या निवडणुकीत सर्व मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी उद्योग, आस्थापना व कारखान्यांमधील कामगार कर्मचाऱ्यांना या दिवशी सुट्टी किंवा सवलत देणे बंधनकारक आहे, असे परिपत्रक उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने जारी केले आहे.

निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी तसेच कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असलेल्या मतदारांनाही निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याचबरोबर ही सुट्टी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू असेल. यात खासगी कंपन्यांतील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किवा इतर आस्थापना तसेच माहिती तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, माल्स, रिटेलर्स आदींना हे आदेश लागू राहणार आहेत.

अपवादात्मक परिस्थितीत अनुपस्थितीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होईल अशा धोकादायक अथवा लोकोपयोगी सेवेत अथवा आस्थापनांच्या संदर्भात पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल, तर दोन ते तीन तासांची विशेष सवलत मिळेल याची दक्षता घ्यावी.

## 'राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाबाबत भाजपला विचारावे लागेल'



**मुंबई** : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का यावर चर्चा सुरू आहे. दरम्यान, राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाबाबत चर्चा सुरू असती, तर अजित पवारांनी मला सांगितले असते, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणालेत. त्यामुळे भाजपला विचारल्याशिवाय हा निर्णय घेता येणार नाही, असे मत राष्ट्रवादीचे नेते व मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केले आहे.

प्रसारमाध्यमांशी बोलताना मंत्री भुजबळ म्हणाले की, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्यात अशी अनेकांची इच्छा आहे. ठाकरे एकत्र आले मग पवारही यावेत याबाबत काही चर्चा झाल्या की नाही याची कल्पना नाही, पण हे सर्व करायचे असेल, तर भाजपला विचारून करावे लागेल, कारण आम्ही त्यांच्याबरोबर सरकारमध्ये आहोत.

## निवडक

### संसदेच्या अधिवेशनामध्ये गदारोळ; कामकाज स्थगित

**नवी दिल्ली** : लोकसभेत सोमवारी (दि.२) विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांच्या पुस्तकाचा संदर्भ देत डोकलाममध्ये चिनी टँक असल्याचा उल्लेख केला. त्यावर संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी यावर आक्षेप घेतला. त्यानंतर राहुल यांनी आपले म्हणणे रेटण्याचा प्रयत्न केला, पण लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी त्यांना थांबवले आणि केवळ राष्ट्रपतींच्या अभिभाषणासंबंधी बोलावे, अशी सूचना केली. तरीही गदारोळ सुरूच राहिल्याने सभापतींनी कामकाज स्थगित केले.

### पुणे कार अपघात प्रकरणात दीड वर्षानंतर तिघांना जामीन

**पुणे** : येथील बहुचर्चित कल्याणीनगर पोर्शे कार अपघात प्रकरणात सोमवारी (दि. २) सर्वोच्च न्यायालयाने रक्ताचे नमुने बदलल्याचा आरोप असलेल्या तीन प्रमुख आरोपींना न्यायालयाने नियमित जामीन मंजूर केला. यामध्ये आदित्य अविनाश सूद, आशिष सतीश मित्तल आणि अमर संतोष गायकवाड यांचा समावेश आहे. सुमारे १८ महिने तुरुंगात राहिल्यानंतर या तिघांची सुटका होणार आहे.

## शेकाप उत्तर भारतीय सेलच्या पनवेल तालुका अध्यक्ष ममता जैसवाल समर्थकांसह भाजपमध्ये

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेकापला लागलेली घरघर थांबायचे नाव घेत नाही. शेकापला आणखी एक झटका मिळाला आहे. शेकाप पुरस्कृत उत्तर भारतीय सेलच्या पनवेल तालुका महिला अध्यक्ष ममता जैसवाल यांनी अनेक समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. सुकापूर येथे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश झाला.



या पक्षप्रवेश कार्यक्रमाला उत्तर भारतीय समाजाचे नेते संतोष शर्मा, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, सरपंच ज्योती केणी, उपसरपंच दिवेश भगत, माजी सरपंच योगिता पाटील, आलूराम केणी, पांडुरंग केणी, ग्रामपंचायत सदस्य महेश पाटील, चंद्रकांत पोपेटा, अशोक पाटील, उदय म्हसकर, राजेश पाटील, योगेश पाटील, राहुल पोपेटा, महेश केणी, हनुमान खुटले, शशिकांत पाटील, विभागीय अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, रवींद्र केणी, सादिक शेख, उषा पाटील, उज्वला म्हसकर यांच्यासह स्थानिक नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ममता जैस्वाल आणि सहकाऱ्यांच्या प्रवेशामुळे पनवेल तालुक्यात भाजपची संघटनात्मक ताकद अधिक वाढेल, असा विश्वास या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला.

उत्तर भारतीय सेलच्या पनवेल तालुका महिला अध्यक्ष ममता जैसवाल यांच्यासमवेत अभिषेक यादव, विवेक यादव, ज्योतिषलाल यादव, संगीता यादव, रजनीश सिंह, रिता वर्मा, वंदना वर्मा, रेणू यादव, संगिता वर्मा, रेणू वर्मा, सुभावती वर्मा, रिमा ताऊर, रेखा गौतम, रूपा गौतम, संजू सिंह, वर्षा कोरी, अर्चना विश्वकर्मा, कृतू जशावन, शिम्पी गुप्ता, निशा चौहान, रितू शिवधन, संगीता सोनी, रिंकी पांडे, खुशबू गुप्ता, संजना गुप्ता, स्वाती कामबडे, पूनम विश्वकर्मा, सुभाती देवी, चंद्रज्योती, संगिता मोर्या, पूनम वर्मा, चिंता शर्मा, नीलम विश्वकर्मा, पूनम शुक्ला, साधना शुक्ला, रुची सिंह, बिंदू राय, मीरा शर्मा, शीतल शर्मा, अंजली वर्मा, निशा गुप्ता, आशा सिंह, उषा जैस्वाल, सुशीला चौहान, संगीता यादव, मनिषा चौहान, रिता विश्वकर्मा, सुषमा चौहान, सुनीता शर्मा, संध्या शर्मा, सुमन पांडे, अमृता पांडे, साधना शुक्ला, रागिनी पांडे, सुसुम शर्मा, मृदुला शर्मा, पूनम शुक्ला, रंजन सिंह, गायत्री मिश्रा, रूची तोमर, सरिता सिंह, आरती राजभट, पुष्पा गुप्ता, सुनीता यादव, रेणू गुप्ता, प्रिया गुप्ता, ज्योती गुप्ता, कंचन तिवारी, आरती तिवारी, रूपा परम, कुसुम मोर्या, मिथलेश देवी, मीरा सिंह, पूनम मोर्या, पूनम कनोजिया, जया देवी, शांती शर्मा, खैरू सिंह, कुसुम वर्मा, फुलमती विश्वकर्मा, ममता अरविंद गुप्ता, सोनबादशाह, अनिता जैसवाल, आपण म्हात्रे, मंता गौरी, वंदना तारडे, मीरा दुबे, आशा शर्मा, सरिता पांडे, सुनीता सिंह, अंजू शर्मा, प्रणिती कोलकर आदींनी भाजपमध्ये प्रवेश केला. या सर्वांचे पक्षात स्वागत करण्यात आले.



## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांनी घेतली विदीप जाधव यांच्या कुटुंबियांची भेट

**सातारा : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह त्यांचे सुरक्षारक्षक विदीप जाधव यांचा बारामती येथे झालेल्या विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला होता. या दुःखद घटनेनंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी स्वतःचे दुःख बाजूला ठेवत दिवंगत विदीप जाधव यांच्या तरडगाव (ता. फलटण) येथील निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिवंगत जाधव यांच्या पत्नी व मुलांच्या डोक्यावर मायेने हात फिरवत, कोणत्याही अडचणीत मी तुमच्यासोबत आहे, असा धीर देऊन जाधव कुटुंबियास आधार दिला. या भावस्पर्शी भेटीने उपस्थितांचे डोळे पाणावले.

कर्तव्यपथावर असतानाही अत्यंत संयम व मायेने जाधव कुटुंबियांचे दुःख हलके करण्याचा प्रयत्न करत उपमुख्यमंत्री पवार यांनी संवेदनशीलतेचा आदर्श घालून दिला आहे.

## झेडपी निवडणुकीत गृहभेटीवर उमेदवारांचा भर



(प्रातिनिधीक छायाचित्र)

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीला अवघे चार दिवस उरले आहत. त्यामुळे प्रचाराला वेग आला आहे. प्रचारासाठी समाजमाध्यामांचा वापर केला जात आहे तसेच मोठ्या सभांवरील खर्च टाळून गावबैठका आणि घरभेटींवर उमेदवारांनी भर दिला आहे.

निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात आल्याने उमेदवारांसह कार्यकर्त्यांची लगबग वाढली आहे. प्रमुख पक्षांच्या उमेदवारांनी गावभेटी, घरोघरी मतदारांशी संवाद साधण्यावर भर दिला असून मोठी मतसंख्या असलेल्या गावांवर लक्ष केंद्रित केले आहे. एकाच ठिकाणी अनेक मतदारांशी कमी वेळात संपर्क साधता येत असल्याने उमेदवारांना हा प्रचार सोयीचा पडत आहे. मोठी गावे व ग्रामपंचायतींमध्ये प्रचाराची तसेच उमेदवाराबाबत वातावरण निर्मितीही लवकर होते.

आपली भूमिका जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहचणे उमेदवाराला सोयीचे होत असल्याने मोठ्या लोकसंख्येच्या व मतदार संख्या असलेल्या गावांवर उमेदवारांचे विशेष लक्ष आहे. अशा मोठ्या ग्रामपंचायतीमधूनच मताधिक्य मिळत असल्याने या ठिकाणी प्रचार बैठका, कोपरा सभा, प्रचारफेऱ्या सुरू आहेत.

जिल्ह्याच्या सर्वच भागात प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. ग्रामीण भागामध्ये वाड्या-वस्त्या दुर्गम ठिकाणी असल्याने प्रचारासाठी दिवस वाया जातो तसेच त्या तुलनेत मतदारांशी संपर्कही कमी प्रमाणात होतो. मोठ्या गावांत व ग्रामपंचायतींमध्ये एकाच ठिकाणी जास्त मतदार संपर्कात येत असल्याने आता उमेदवारांनी अंतिम टप्प्यात जास्त लोकसंख्या असलेली गावे निश्चित करण्यास सुरुवात केली आहे.

## डी.बी. म्हात्रेंकडून कुस्ती संकुलाबाबत खोटा प्रचार

### संस्थापक पै. रूपेश पावशे यांनी केला पर्दाफाश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील नितळस गावात उभारण्यात आलेले छत्रपती संभाजी महाराज आणि लोकनेते रामशेठ ठाकूर राष्ट्रीय कुस्ती संकुल आपणच बांधल्याचा खोटा प्रचार शेतकरी कामगार पक्षाचे नेते डी.बी. म्हात्रे करत असल्याचा गंभीर आरोप या संकुलाचे संस्थापक अध्यक्ष व प्रशिक्षक पै. रुपेश पावशे यांनी केला आहे. निवडणुकीच्या निमित्ताने महाविकास आघाडी व शेतकरी कामगार पक्षाकडून मतदारांची दिशाभूल करण्याचा हा प्रयत्न असल्याचेही त्यांनी स्पष्टपणे सांगितले.





पै. रूपेश पावशे यांनी स्पष्ट केले की, या कुस्ती संकुलाच्या उभारणीसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वतःच्या खिशातून सुमारे २३ लाख रुपयांचा खर्च केला आहे तसेच या संकुलाची मासिक देखभाल पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर हे दरमहा ३० ते ४० हजार रुपये स्वखर्चाने करत आहेत. असे असताना या संकुलाचे श्रेय घेण्याच्या नादात डी.बी. म्हात्रे खोटी माहिती पसरवत आहेत.

ते पुढे म्हणाले, पनवेल तालुक्यात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची विकासकामे झाली असून अनेक कामे त्यांनी पुढाकाराने व स्वखर्चाने केली आहेत. त्याच अनुषंगाने नितळस गावात नवोदित व होतकरू कुस्तीपटूंकरिता छत्रपती संभाजी महाराज व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नावाने सुसज्ज, राष्ट्रीय दर्जाचे कुस्ती संकुल उभारण्यात आले आहे. या संकुलाच्या उभारणीच्या वेळी डी.बी. म्हात्रे यांनी केवळ पाच ते सहा लाख रुपयांची मदत केली होती. उर्वरित खर्चासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे जाण्याचा सल्ला स्वतः डी.बी. म्हात्रे यांनी दिला होता.

यानंतर लगेचच आम्ही आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेऊन संकुलाचा प्रस्ताव मांडला असता त्यांनी त्वरित होकार देत २३ लाख रुपयांचा स्वखर्च करून संकुल उभारले, मात्र निवडणुका आल्याने या कुस्ती संकुलाच्या नावावर मते मिळवण्यासाठी डी.बी. म्हात्रे जाणीवपूर्वक खोटी माहिती पसरवत असून 'हे संकुल मीच बांधले' असा दावा करत फिरत आहेत. प्रत्यक्षात या संकुलाच्या उभारणीत आमदार प्रशांत ठाकूर यांचा मोठा वाटा असून त्यांच्या योगदानाकडे दुर्लक्ष करून केलेला हा प्रचार पूर्णतः दिशाभूल करणारा आहे, असे पै. रुपेश पावशे यांनी ठामपणे सांगितले. दरम्यान, पावशे यांनी केलेल्या या खुलाशामुळे डी.बी. म्हात्रे यांचा दावा पूर्णपणे फोल ठरला असून त्यांच्या खोट्या प्रचाराचा पर्दाफाश झाला आहे.

# शेकापसमोर अलिबाग पं. स.ची सत्ता राखण्याचे आव्हान

**अलिबाग : प्रतिनिधी**



रायगड जिल्हा परिषद निवडणुकीत शेतकरी कामगार पक्ष आलिबाग तालुक्यातील सात पैकी पाच जागा लढवत आहे. दोन जागा त्यांनी महाविकास आघाडीतल घटक पक्षांना सोडल्या आहेत. तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या पाच जागा निवडून आणायच्या त्याचबोरोबर अलिबाग पंचायात समितीची सत्ता राखण्याचे आव्हान शेकापसामोर आहे.

अलिबाग पंचयात समितीच्या एकूण १४ जाग आहेत. शिवसेना सर्व १४ जागा लढवत आहे.भाजपाने ८ ठिकाणी आपले उमेदवार उभेकेले आहेत. महाविकास आआडी करून शेकाप १३ जागा लढवत आहे. राष्ट्रवारदी काँग्रेस दोन जागा लढवत आहे. काँग्रेस व शिवसेना ठाकरे गट यांनी प्रत्येकी एका जागी आपले उमेदवार उभे केले आहेत. आवास, किहीम, थळ, सरसोली, रामराज या मतदारसंघांमध्ये दुरंगी लढत आहे. अक्षी मतदारसंघात पाच उमेदवार आहेत. आंबेपूर,शहापूर, वैजाळी या मतदारसंघांमध्ये चौरंगी लढत आहे. रूईशेत भोमोली, चेंढरे,रेवदंडा, चौल व कावीर पाच मतदारसंघांमध्ये तीरंगी लढत आहे.

मागील काही वर्षात शेकाप फुटल्यामुळे या पक्षाची ताकद अलिबाग तालुक्यात देखील कमी झाली आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीत शेकापने नवख्या उमेदवारांना उमेदवारी दिली आहे. अलिबाग तालुका हा शेकापचा बालेकिल्ला आहे. याच तालुक्यात आता शेकापला आपल्या अस्तीत्वासाठी लढावे आलगत आहे. अलिबाग तालुक्यात शेकापविरूध्द सर्व पक्ष मिळून लढत असत त्याच शेकापर आता इतर पक्षांशी आघाडी करून निवडणूक लढवण्याची वेळ आली आहे. अलिबाग तालुक्यात शेकाप जिल्हा परिषदेच्या पाच जागा लढवत आहे. पांचायत समितीच्या १३ जागा लढवत आहे. जिल्हा परिषदेच्या सत्तेत बदल झाला तरी अलिबाग पंचायत समितीची सत्ता गेली कित्तेक वर्षे शेकापकडेच राहीली आहे.

आवास, किहीम, थळ, वरसोली, या चार मतदारसंघामध्ये शेकाप विरूध्द शिवसेना अशी थेट लढत आहे. रूईशेत भोमोली, चेंढरे, रेवदंडा, चौल, कावीर या मतदारसंघांमध्ये शिवसेना, शेकाप व भाजपा अशी तीरंगी लढत होणार आहे. याच मतदारसंघामधील निकाल पंचायत समितीवरील सत्ता मिळवण्यासाठी महत्वाचे ठरणार आहेत.अलिबाग पंचाययात समितीची सत्ता मिळविण्यसाठी किमान ८ जागा जिंकाव्या लागणार आहेत.

# इंधन वाचवा, हरित ऊर्जा वापरा, देशाला वाचवा!

**मुंबई : प्रतिनिधी**



सार्वजनिक परिवहन सेवा वापर करा व इंधन वाचवा असे आवाहन करत कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी हरित ऊर्जा वापरण्याचे व पर्यावरण रक्षण करण्याचे आवाहन सक्षम २०२५-२६ (संरक्षण क्षमता महोत्सव) या देशातील ऑइल कंपन्याच्या जनजागृती कार्यक्रमात रवींद्र नाट्य मंदिर प्रभादेवी, मुंबई येथे केले.

या कार्यक्रमाचे अंतिम उद्दिष्ट म्हणजे जीवाश्म इंधनावरील वाया जाणारा खर्च रोखणे, परकीय तिजोरीवरील बाडता भार कमी करणे आणि जीवाश्म इंधन जाळण्यामुळे निर्माण होणाऱ्या हरितगृह वायूंच्या प्रतिकूल परिणामांपासून पर्यावरणाचे संरक्षण करणे, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय आणि तेल उद्योगाचे राज्यस्तरीय समन्वयक संबंधित राज्य सरकारच्या सक्रिय सहभागाने समर्थनाने जनजागृती पसरविण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतात.

सक्षम २०२५-२६ हे १ ते १५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आयोजित केले जातील, संपूर्ण देशभर ज्याची टॅगलाइन कन्सर्व ऑइल अँड गॅस, गो ग्रीन अशी असेल.

१ ते १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत तेल विपणन कंपन्या (ओएमसी) राज्यभरात संवर्धनाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणासाठी वर्तनात्मक बदलांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत असे महाराष्ट्र कार्यक्रम समन्वयक दिपक वाघ यांनी सांगितले.

उमेश कुलकर्णी, राज्यस्तरीय समन्वयक, महाराष्ट्र, थॉमस जेम्स, प्रमुख रिटेल (पश्चिम), इतर कंपन्यंचा समावेश होता.

# नवी मुंबई विमानतळ आता २४ तास कार्यान्वित; हवाई प्रवासाला नवे बळ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



नवी मुंबई विमानतळ २५ डिसेंबरपासून प्रवाशांसाठी सुरू झालं होतं. त्यावेळी हे विमानतळ फक्त १२ तासांसाठी कार्यन्वित होतं, परंतु १ फेब्रुवारीपासून २४ तास सुरू ठेवण्यातआले आहे. सकाळी ८ ते सायंकाळी ८ पर्यंत सुरू असलेलं विमानतळवर आता २४ तास विमानसेवा सुरू राहतील. यामुळे विमानतळावरील उड्डाणांची संख्या लवकरच वाढणार आहे.

सध्या केवळ दोनच विमानांची भर घालण्यात आली आहे, परंतु येत्या काही दिवसांत आणि आठवड्यांत विमान कंपन्या नवी मुंबईतील आपले वेळापत्रक वाढवतील अशी अपेक्षा आहे, असे सूत्रांनी सांगितले. मार्च महिन्याच्या अखेरीस, जेव्हा विमान कंपन्यांचे उन्हाळी वेळापत्रक सुरू होईल, तेव्हा विमानसेवेच्या संख्येत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे.

१२ जानेवारी रोजी, नवी मुंबई विमानतळाने एक महत्त्वाचा परिचालन टप्पा पार केला होता. विमानतळ सुरू झाल्यापासून फक्त १९ दिवसांत तब्बल १ लाख प्रवाशांनी प्रवास केला होता. युरोप आणि अमेरिकेत, प्रमुख विमानतळ वगळता, बहुतेक विमानतळे ध्वनी प्रदूषण मर्यादित करण्याच्या रात्रीच्या संचारबंदीच्या नियमांनुसार, सहसा रात्री ११ ते पहाटे ५ या वेळेत बंद होतात. ही विमानतळे बंद झाल्यावर अडकलेल्या प्रवाशांना टर्मिनल सोडावे लागते. परंतु, भारतातील प्रमुख विमानतळे २४ तास खुली राहतात. यामुळे विमानतळावर अडकलेल्या प्रवाशांना रात्रभर राहण्यासाठी एक सुरक्षित जागा मिळते.

अद्याप रात्री उशिराच्या कोणत्याही विमानांचं वेळापत्रक निश्चित केलंलं नाही पण लवकरच मध्यरात्रीच्या सेवा ही सुरू करण्यात येतील. सध्या नवी मुंबई विमानतळावरील शेवटचं विमान रात्री ९.५० ला उड्डाण घेणार असून, पहिलं उड्डाण सकाळी ७.१० वाजता होणार आहे. विमान वाहतूक उद्योगातील सूत्रांनी सांगितले की, उन्हाळी वेळापत्रक सुरू झाल्यावर आणखी विमानांची भर घातली जाईल. सध्या प्रतितास १० विमानांची हालचाल असलेली संख्या येत्या एप्रिल महिन्यापर्यंत दुप्पट म्हणजेच, २० होण्याची शक्यता आहे.

# वकील न्यायव्यवस्थेचा कणा -ॲड. गायकवाड

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ विधी महाविद्यालयातील प्रथम वर्ष आणि द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबीर आयोजित केले होते. दिवाणी अँड.दिपक गायकवाड प्रमुख वक्ते होते.याप्रसंगी केटीएसपी मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम,उपाध्यक्ष अबूबकर जळगांवकर,विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या वर्षा घारे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करून कार्यक्रमाला प्रारंभ करण्यात आला.

वकीला शिवाय न्यायव्यवस्था सुरू पण होवू शकत नाही, चालू पण होवू शकत नाही आणि संपवू पण शकत नाही अशा अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या न्यायव्यवस्थेचा वकील कणा आहे.अशा अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या न्यायव्यवस्थेचे पहिल्या आणि दुसऱ्या वर्षाचे विद्यार्थी आहात. त्यामुळे आपल्या बोलण्या वागण्यामध्ये आपल्या व्यावसायाबद्दल गंभीरता आणि पावित्र हे आपल्या ह्रदयात आलं पाहिजे. तुम्हाला एखादं युध्द जिंकायचं असेल तर तुम्हाला तुमच्या ताकदीवर विश्वास पाहिजे तरच तुम्ही युध्द जिंकू शकाल तसच वकीलीमध्ये यायचं असेल तर आपल्याला स्वतःवर विश्वास पाहिजे अशा प्रेणादायी मार्गदर्शन केले

# भाजपच्या नगरसेवकांची आमदार मंदा म्हात्रे यांनी घेतली भेट



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कोकण भवन येथे सोमवारी गटनोंदणी प्रक्रिये करिता आलेल्या मुंबई महापालिकेतील भारतीय जनता पार्टीच्या विजयी नगरसेवकांनी बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांची सदिच्छा भेट घेतली. सदर भेटी दरम्यान आमदार मंदा म्हात्रे यांनी सर्व विजयी नगरसेवकांचे अभिनंदन केले पुढील काळात मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी संघटितपणे काम करा , मुंबईतील सर्वसामान्य जनतेची कामे करा असा सल्ला आ मंदा म्हात्रे यांनी नवनिर्वाचित नगरसेवकांना दिला.

यावेळी गटनोंदणी प्रक्रिये संदर्भात सकारात्मक चर्चा होऊन पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यावर भर देत आगामी काळासाठी आमदार म्हात्रे यांनी शुभेच्या दिल्या.यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत भारतीय जनता पार्टीचे नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थित होते.

# कडसुरे ग्रामस्थांच्या रिलायन्स कंपनीबाबत असलेल्या समस्या सोडविणार -किशोर जैन

**नागोठणे : बातमीदार**



नागोठणे रिलायन्स कंपनीचा वाढीव प्रकल्पासाठी अंबानी कुटुंबीय हजारो कोटी रुपयांची ईनव्हेसमेंट करीत आहे परंतु नागोठणे विभागासाठी काहीही करीत नाही. नागोठणे विभागाचा जामनगर धर्तीवर विकास झाला पाहिजे यासाठी मी आग्रही आहेच. आपले नेते खासदार सुनिल तटकरे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली कडसुरे ग्रामस्थांच्या रिलायन्स कंपनी बाबत असलेल्या सर्व समस्या सोडविणार असल्याचे अभिवचन नागोठणे जिल्हा परिषद गटातील राष्ट्रवादी काँग्रेस भाजप युतीचे उमेदवार किशोरभाई जैन यांनी कडसुरे ग्रामस्थांना दिले. दरम्यान गावबैठकीच्या प्रारंभी महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहन्यात आली.

नागोठणे जिल्हा परिषद गटातील राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवार किशोरभाई जैन व सुकेळी पंचायत समिती गटातील भाजपच्या उमेदवार योगिता विलास शिद यांच्या प्रचारार्थ नागोठणे जवळील कडसुरे गावात रविवारी ( दि. १ ) सायंकाळी गाव बैठक घेण्यात आली त्यावेळी उपस्थित ग्रामस्थांना संबोधित करताना किशोरभाई जैन बोलत होते. यावेळी नागोठणे जिल्हा परिषद गटातील उमेदवार किशोरभाई जैन, सुकेळी पंचायत समिती गणातील उमेदवार योगिता विलास शिद, राष्ट्रवादीचे नेते शिवरामभाऊ शिंदे, संजय भोसले, भाजप नेते सोपान जांबेकर, किशोरभाई म्हात्रे, मारुती देवरे, महादेव मोहिते, कडसुरे गावातील सामाजिक कार्यकर्ते अरुण शिर्के, कडसुरे सरपंच राजेंद्र शिंदे, भाई शिर्के, माजी पं. स. सदस्या अमिता शिंदे, कडसुरे माजी सरपंच भावना शिर्के, भाजपच्या महिला नेत्या अपर्णा सुटे, वैशाली शेडगे, भगवान शिद, रविंद्र शिर्के, सागर शिर्के, संतोष लाड, किशोर नावले, किशोर शिर्के यांच्यासह राष्ट्रवादी व भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. दरम्यान या गावबैठकीचे प्रास्ताविक अरुण शिर्के यांनी तर आभार प्रदर्शन राजेंद्र शिंदे यांनी केले.

किशोरभाई जैन मार्गदर्शन करताना पुढे म्हणाले की, रिलायन्स व्यवस्थापनेने कडसुरे ग्रामस्थांची कवडी मोल भावात जमिनी विकत घेऊन घरटी एका माणसाला नोकरी दिली आणि आता निवृत्त देखील झाले आहेत. आता पुढे काय? त्यामुळे रिलायन्स कंपनीने कडसुरे ग्रामस्थांना सर्व सोई सुविधा देऊन रोजगार तसेच महिलांना स्वयं रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी मी अग्रही राहणार आहे. नागोठणे जिल्हा परिषद मतदार संघात एम्प्लॉईमेंट एक्सचेंज कार्यालय स्थापन करून सर्व सुशिक्षित तरुणांची नोंद करून त्यांना आपल्या परिसरातील कंपनीत नोकरी मिळालीच पाहिजे यासाठी नेते खासदार सुनिल तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली खात्रीशीरपणे प्रयत्न करीन तसेच नागोठणे तालुका होण्यासाठी कुठलीही अडचण नाही

# बेशिस्त वाहनचालकांवर खोपोली पोलिसांची कारवाई

**खोपोली : प्रतिनिधी**



जनता विद्यालयाच्या समोरील रस्त्यांवर वाहने उभे करून नियमाचे उल्लगन करणाऱ्या वाहन चालका विरोधात खोपोली पोलिसांनी अचानक कारवाईचा बडगा उग रल्याने वाहनचालकात गडबड उडाली.

शाळा सुटल्यानंतर मोठ्या प्रमाणात शाळेत सोडण्यासाठी आलेल्या पालकांची गर्दी त्याचप्रमाणे शाळेच्या बसवाल्यांची गर्दी यामुळे या रस्त्यावरून वाहन चालवणे किंवा चालणे मोठ्या जिकरीचे झाले होते, यावर याबाबत नेहमीच समाज माध्यमांवर अशा बेशिस्त वाहन चालकांविरुद्ध चर्चा होत असे, आजही त्याचप्रमाणे चर्चेचे वादळ उठले आणि याची दखल पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी घेत त्या ठिकाणी एक अधिकारी व २ वाहतूक पोलीस कर्मचारी यांची शाळा सुटण्याच्या वेळेत वाहतूक नियंत्रण करण्यासाठी नेमणूक करण्यात आले

पोलिसांनी मोठ्या प्रमाणात बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध कारवाईचा बडगा उभारल्याने खळबळ उडाली. पोलिसांच्या या आक्रमक भूमिकेमुळे जनता विद्यालय समोरील रस्त्याने मोकळा श्वास घेतला आणि रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या पादचाऱ्यांनी तसेच पालकांनी खोपोली पोलिसांच्या भूमिकेचे स्वागत केले आहे.

# कोकण रेल्वे प्रशासनाबरोबर प्रवासी महासंघाची बैठक

**नवी मुंबई : बातमीदार**

कोकण रेल्वेशी निगडीत समस्यांबाबत महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघ व इतर कोकण रेल्वे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी कोकण रेल्वे प्रश्नांबाबत बेलापुर येथील कोकण रेल्वेच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन आपले म्हणणे मांडले. या बैठकीत सकारात्मक चर्चा झाल्याने रेल्वे प्रवासी महासंघाने सांगितले. यावेळी कोंकण रेल्वेचे अधिकारी आशुतोष श्रीवास्तव,एल. प्रकाश,राजेंद्र कुमार शर्मा, जुबेर पठाण,राजेंद्र घोलप , राजेश ठोंबल, बाळासाहेब निकम, पी. जी. नायर हे अधिकारी उपस्थित होते.

सावंतवाडी टर्मिनसच्या बिल्डिंगचे काम तातडीने सुरू करण्यात येत आहे. टर्मिनस लाइन चे काम सुरू करण्यासाठी ४०० कोटी निधी अपेक्षित आहे. कोंकण रेल्वेकडे निधी नसल्या मुळे काम रखडले असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. सावंतवाडीला सरकता जिना लवकरच चालू करण्यात येईल तसेच कोच इंडिकेशन सिस्टम सुरू करण्यात येईल. राजापूर, कुडाळ, कणकवली येथे सरकता जिना आणि लिफ्टचे काम लवकरात लवकर सुरू करण्यात येईल. विलवडे प्लॅटफॉर्मची उंची वाढवण्यात येईल. कणकवली स्टेशनवर प्लॅटफॉर्म शेड व प्लॅटफॉर्म वाढवण्याचे निवेदन दिले. वांद्रे मडगाव अधिक थांबे मिळवण्यासाठी सकारात्मक चर्चा झाली. मंगलोर एक्सप्रेसला लवकरच सावंतवाडी थांबा मंजूर होईल. दादर ते सावंतवाडी तुतारी एक्सप्रेस लवकरच २२ डब्यांसह सुरू करण्यात येईल. कोरोनाध्ये बंद झालेला पनवेल राखीव जनरल डब्बा २२ डब्बे झाल्यावर सुरू करण्यात येईल. रत्नागिरी ते सावंतवाडी पॅसेंजर पुन्हा चालू करण्याच्या विषयावर सकारात्मकता दर्शवली आहे. कोंकण रेल्वे च्या दुहेरीकरणासाठी प्राथमिक सर्वेचे काम सुरू आहे. प्रकल्प ग्रस्तांसाठी जागा राखीव आहेत.



# नवी मुंबई ब्राह्मण समाजाचा कुटुंब मेळावा-२०२६ उत्साहात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



स्वत:ला ओळखून आपण निवडलेल्या क्षेत्रातील उत्तमता आणि प्रतिभा याचा अवलंब करून जीवनाची साधना करावी तसेच रोज योग, ध्यान करा आणि सतत नवीन गोष्टी शिकत राहा, नवीन शिकण्यामध्ये मेंदू रोज नवी आव्हाने घेत असतो. त्या शिकण्यातून आपण ताजेतवाने राहतो, असे प्रतिपादन माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी केले. स्वत:ची ओळख हीच जीवनाची खरी ओळख आणि सार्थकता असल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले.

टाटा रुग्णालयात उपचार घेत असलेल्या कर्करोग रुग्णांना सहाय्य करण्याच्या दृष्टीने नवी मुंबई ब्राह्मण समाज समूहाच्या वतीने रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी नेरूळ येथील तेरणा ऑडिटोरियम येथे कुटुंब मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात सामाजिक-सांस्कृतिक कार्यक्रमात जिंकणाऱ्या जीवनाची साधना या विषयावर श्री. धर्माधिकारी यांनी मार्गदर्शन केले. भारतीय संस्कृती, तिचे महत्त्व, वेद, उपनिषद यांवर भाष्य करताना श्री. धर्माधिकारी यांनी अगदी सहज पद्धतीने दुसऱ्यासाठी जगणे कसे महत्त्वाचे हे सांगितले. अगदी सोप्या भाषेत परंतु तितकेच महत्त्वाचे ज्ञान देताना त्यांनी जीवनाच्या अंगाचा केलेला विचार श्रोत्यांना व्यापून गेला. यावेळी नवी मुंबई ब्राह्मण समाज समूह संस्थापक प्रसाद अग्निहोत्री, टाटा रुग्णालयातील तज्ज्ञ डॉ. अनंत गोकर्ण, महेश भालेराव चंद्रकांत मंद्रूपकर, मंदार कुलकर्णी, दिपाली जोशी, मंजुषा भावे, प्राजक्ता दिवेकर, दिपाली लाभे, संपदा केजकर, तेजस्वी काळे, सुरेंद्र केतकर, पनवेल व नवी मुंबई परिसरातील ब्राह्मण समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

युवकांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून श्री गणेश वंदना, वासरी वादनाने या कार्यक्रमाची सुरुवात झाली. तसेच महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अर्थात अमृत या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेच्या विविध योजनांची माहिती शैलेश मराठे यांनी दिली. यावेळी आनंद क्षण-ये हृदयाचे ते हृदयहा कव्य वाचनाचा विशेष कार्यक्रम झाला. याबरोबरच अमृत योजना माहिती दिली. या वेळी प्रमुख अतिथींच्या हस्ते 'ब्रह्म तेज' या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. या वेळी उपस्थितांना टाटा रुग्णालयात उपचार घेत असलेल्या कर्करोग रूग्णांना आर्थिक सहाय्य करण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला उपस्थितांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला.

# हवामानात बदल; उकाड्याची चाहूल


**पनवेल : दादाराम मिसाळ**

गेल्या काही दिवसांपासून तापमानात सातत्याने बदल होताना दिसत आहे. आता फेब्रुवारी महिन्याला सुरुवात झाली असून थंडी कमी राहण्याचा अंदाज आहे. सध्या राज्यात ढगाळ वातावरण बघायला मिळत आहे. त्याचप्रमाणे उकाड्याची चाहूल लागली आहे.

ढगाळ वातावरणामुळे तापमानात चढ उतार सातत्याने बघायला मिळतोय. कधी पाऊस पडेल असे वाटते. जानेवारीप्रमाणेच फेब्रुवारी महिन्यातही वातावरणात मोठे बदल दिसतील असे चित्र आहे. सध्या थंडी फार काही नाहीये. उकाडा जाणवू लागला आहे. दुपारच्या वेळी उन्हाच्या झळा जाणवू लागतात.

दरम्यान, सततच्या हवामान बदलामुळे सर्दी, खोकला आणि ताप यांच्या रुग्णात मोठी वाढ होत आहे. या काळात नागरिकांनी आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे.

## दुखवटा — दामोदर ठाकूर



**कर्जत :** खारपाले (ता. पेण) येथील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक दामोदर हशा ठाकूर यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी अल्पशा आजाराने राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सुन, नातु असा परिवार आहे, त्यांचे दशक्रिया विधी १० फेब्रुवारी रोजी उध्दव रामेश्वर पाली, तर उत्तरकार्य १४ फेब्रुवारी रोजी राहत्या घरी खारपाले येथे होणार आहेत.

## निवडक

### दुचाकीच्या धडकेत पादचारी जखमी

**पनवेल :** मोटरसायकलने दिलेल्या धडकेत चाळीस वर्षीय पादचारी जखमी झाल्याची घटना पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. संदीप पालवे असे या जखमी पादचाऱ्याचे नाव असून ते वरप, कल्याण येथे राहतात. संदीप पालवे हे जेडब्ल्यूआर कंपनीच्या समोरील पनवेल – जेएनपीटीकडे जाणाऱ्या महामार्गाच्या सेवा रस्त्यावर उभे होते. यावेळी जेएनपीटी कडून पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव दुचाकी चालकाने संदीप पालवे यांना जोराची धडक दिली. या धडकेत संदीप पालवे यांच्या छातीला आणि उजव्या पायाला दुखापत होऊन ते गंभीर जखमी झाली. त्यानंतर संदीप पालवे यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीच्या दुचाकी चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### बोनशेत गावात घराला आग


**पनवेल :** तालुक्यातील बोनशेत गावात श्याम फडके व रूपेश फडके यांच्या घराला रविवारी रात्री आग लागून मोठी दुर्घटना घडली. या आगीत घरातील सर्व साहित्य पूर्णतः जळून खाक झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही, मात्र कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, संबंधित यंत्रणांकडून तपास सुरू आहे. ग्रामस्थांनीही तत्काळ मदतीसाठी पुढाकार घेतला. ही घटना पनवेल तालुका परिसरात हळहळ व्यक्त करणारी ठरली आहे.

### उरणमध्ये अजितदादांची शोकसभा

**उरण :** उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या अस्थीकलशाचे पूजन व श्रद्धांजली पर शोकसभेचे आयोजन बुधवारी (दि.४) सकाळी ९:३० ते ११ वाजेपर्यंत, आनंदी हॉटेल कोटनाक येथे करण्यात आले आहे. तेथून अस्थी विसर्जन माणकेश्वर मंदिर केगाव समुद्र किनाऱ्यावर करण्याचे नियोजिले आहे. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी या शोकसभेस उपस्थित राहावे, असे आवाहन उरण तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीतर्फे तालुका अध्यक्ष परीक्षित ठाकूर यांनी केले आहे.

### हॉस्पिटलमधून महिला बेपत्ता

**पनवेल :** नवीन पनवेल येथे मानसोपचार हॉस्पिटलमध्ये



उपचार घेत असलेली ३२ वर्षीय महिला बेपत्ता झाल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सुष्मिता स्वमित्र पात्रा असे बेपत्ता महिलेचे नाव असून तिची उंची पाच फूट, रंग सावळा, चेहरा उभट, नाक सरळ, अंगाने सडपातळा आहे. तिने गुलाबी टॉप व पॅन्ट घातली असून गुलाबी शॉल घेतली आहे. या महिलेबाबत कोणाला माहिती मिळाल्यास त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# उरणमध्ये भाजप महायुतीच्या प्रचाराला वेग

## चाणजे परिसरातील उमेदवारांसाठी प्रचार रॅली आणि मतदारांच्या गाठीभेटी

**उरण : वार्ताहर**

रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्व भूमीवर भारतीय जनता पक्ष आणि महायुतीच्या उमेदवारांनी आपला प्रचार वेगाने सुरू केला आहे. चाणजे जिल्हा परिषद २८ गटाचे अधिकृत उमेदवार रीना जितेंद्र घरत, नागाव, म्हातवली, केगाव एन.ए.डी, पंचायत समिती ५५ गणाचे अधिकृत उमेदवार राजेंद्र आत्माराम ठाकूर व चाणजे पंचायत समिती उमेदवार कैलास मोरेश्वर भोईर यांचा प्रचार वेगात सुरू आहे. चाणजे ग्रामपंचायतचे माजी सरपंच तथा चाणजे विभाग भाजप अध्यक्ष जितेंद्र घरत यांच्या मार्गदर्शनाखाली प्रचार रॅली काढण्यात आली होती.



या वेळी भाजप नेते रवी भोईर, करंजा मच्छीमार सोसायटीचे चेअरमन प्रदीप नाखवा, जयवीन कोळी, नारायण नाखवा, उरण शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील, राजेश कोळी, अमर थळी, विकास थळी, सिद्धार्थ नाखवा, राजेश गावडे, हरेश म्हात्रे, रवींद्र म्हात्रे, प्रशांत म्हात्रे, मंगेश म्हात्रे, राजेश नाखवा, भारत नाखवा, महेंद्र कोळी, दीपक नाखवा, सागर नाखवा, अशोक नाखवा, हरेश्वर म्हात्रे, विनोद नाखवा, संजू नाखवा, ऋषींराज कोळी, प्रकाश कोळी, मनोहर कोळी, विलास कोळी, उमेश भगत, राजेंद्र नाखवा, मंगेश कोळी, निलेश नाखवा, विरेंद्र घरत, राजेश बुरुंडे, दिगम्बर म्हात्रे यांच्यासह महायुतीचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. सकाळी ९ वाजता बापदेव पाडा येथून सुरुवात झाली पुढे, कोळी कोंढरी पाडा, कासवले पाडा, सुरकीचा पाडा, वारीआळी, करंजा पाडा, बोबडे पाडा, येथे मोठ्या प्रमाणात प्रचार करण्यात आला.

रायगड जिल्हा परिषद उमेदवार रीना घरत म्हणाल्या की, येथील पाणी, रस्ते, गटारे, महिलांसाठी योजना, सुरक्षितता, स्वावलंबन, स्वयं सहाय्यता बचत गट, आरोग्य याबाबींकडे माझे विशेष लक्ष असेल. त्यासाठी माझे प्रयत्न राहतील.

उमेदवार राजेंद्र ठाकूर म्हणाले की, येथील पाण्याची समस्या आहे ती मी पूर्ण पणे सोडविण्याचा माझा प्रयत्न असेल केगाव दांडा कोस्टल रोड साठी १० कोटींचा निधी आमदार महेश बालदी यांनी आणला आहे. त्याचे काम सुरू आहे लवकरच पूर्ण केले जाईल, पुढील काळात १०० कोटींचा विकास कामासाठी आणून ओएनजीसीपर्यंतचा रोड केला जाणार आहे.

उमेदवार कैलास मोरेश्वर भोईर म्हणाले की, चाणजेविभागात पाण्याच्या समस्या आहेत. त्या सोडविल्या जातील. आमची टीम हि एक साखळी आहे. एकत्र काम करणार आहोत. गावातील समस्या सोडविण्याचा माझा प्रयत्न राहील. आरोग्य, रोजगार या कडे लक्ष दिले जाईल.

आमदार महेश बालदी यांच्या पाठपुराव्यामुळे करंजा बंदर कार्यान्वित झाले असून, त्यांच्या माध्यमातून उरण परिसरात विकासाची अनेक मोठी कामे पूर्णत्वास आली आहेत. यामुळे महायुतीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा, असे आवाहन प्रदीप नाखवा यांनी केले.

> **आमदार महेश बालदी यांनी येथील विकासासाठी बराच निधी आणला आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीवर आपले उमेदवार निवडून आल्यास आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी मिळेल. केंद्रात आणि राज्यात भाजपची सत्ता असल्याने मोठ्या प्रमाणात निधी मिळेल. त्यामुळे येथील विकासाची आणखी कामे होतील.**
> **–जितेंद्र घरत,** भाजप नेते

## रस्त्यामध्ये दगड ठेवून रस्ता अडवल्याने नागरिकांमध्ये संताप

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

उरण तालुक्यातील खोपटे येथील गावाच्या विशेवर असलेल्या रस्त्यामध्ये मोठमोठे दगड ठेऊन येथील पोलीस पाटील पदावर कार्यरत असलेल्या रंगानाथ पाटील यांनी रस्ता अडवल्याने या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या अनेक वाहनचालक व पादचाऱ्यांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. येथील बांधपाडा ग्रामपंचायतीकडे ग्रामस्थांनी अनेकदा तक्रारी करूनही सदर रस्त्यावर आकसाने दगड ठेऊन रस्ता अडवल्याने संपूर्ण गावातील ग्रामस्थ व महिला संताप व्यक्त करीत आहेत.

गावचे पोलीस पाटीलच गावचा रस्ता अडवीत असतील तर त्यांना पोलीस पाटील पदावर राहण्याचा अधिकारच उरत नसल्याचे येथील



ग्रामस्थ म्हणत आहेत. तर रस्त्यातील दगड न काढल्यास येथील ग्रामस्थ या रस्ता अडवीणाऱ्या पोलीस पाटलाच्या विरोधात जनआंदोलन उभारण्याचा इशारा येथील ज्येष्ठ नागरिक विनायक पाटील यांनी ग्रामस्थांच्या वतीने दिला आहे.

## दुबई येथे गुंतवणुकीच्या आमिषाने महिलेची ४३ लाख रुपयांची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल दुबई येथे वेगवेगळ्या व्यवसायामध्ये गुंतवणूक करण्यास भाग पाडून एका भामट्याने पनवेल परिसरातील तक्का परिसरात राहणाऱ्या महिलेची तब्बल ४३ लाख ४१ हजार ३५० रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी हमझा रमकडाचाला (रा. दुबई) याच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हे

तसनीम टोपीवाला असे फसवणूक झालेल्या महिलेचे नाव आहे, त्यांनी जून २०२३ ते फेब्रुवारी २०२४ या कालावधीत हमला याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून दुबई येथे वेगवेगळ्या व्यवसायामध्ये गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी तसनीम गांनी बँक खात्यातून हमझा वाने व्हॉट्सॲपवर पाठवलेल्या विविध खात्यात ४३ लाख ४१ हजार ३५० रुपये पाठवून दिले. ही रक्कम पाठवल्यानंतर हमला याने त्यांना नफा देणे तर दूरच राहिले तसनीम यांनी गुंतवणूक केलेली रक्कमही दिली नाही. याबाबत त्यांनी हमझा याला फोन करून तसेच मेसेज पाठवूनही तो याकडे दुर्लक्ष करू लागला. या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तसनीम यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.



**पनवेल : वैकुंठवासी ह. भ. प. सदाशिव तुकाराम नावडेकर यांच्या ४७ व्या पुण्यतिथीनिमित्त मोरबे येथे श्री. ज्ञानेश्वरी पारायण व भव्य अखंड हरिनाम उत्सवाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी सदिच्छा भेट दिली. या वेळी वारकरी सांप्रदायातील मंडळी, भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील यांच्यासह पदाधिकारी, आणि ग्रामस्थ उपस्थित होते.**

## वृद्धाला साडेचार कोटींचा गंडा घालणाऱ्या आरोपीला अटक

**पनवेल : वार्ताहर**

डिजिटल अरेस्टचा बनाव रचून खारघर येथे राहणाऱ्या ८० वर्षीय वृद्धाला तब्बल चार कोटी ३८ लाख रुपयांचा गंडा घालणाऱ्या टोळीतील आरोपीला नवी मुंबई सायबर पोलिसांनी अटक केली आहे. अनिलकुमार गुलाबभाई पटेल (वय ३७) असे त्याचे नाव असून सायबर पोलिसांनी मुंबई पोलिसांकडून ताब्यात घेऊन त्याला अटक केली आहे. या आरोपीच्या बँक खात्यात फसवणुकीच्या रकमेतील ४० लाख रुपयांहून अधिक रक्कम जमा झाल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.



या सायबर टोळीने खारघर येथे राहणाऱ्या ८० वर्षीय वृद्धाला डिसेंबर २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या नावाचा वापर करून संपर्क साधला होता. तसेच त्यांच्यावर गंभीर गुन्हा दाखल झाल्यामुळे त्यांना अटक करण्यात येत असल्याची भीती घातली. तसेच त्यांना क्राईम ब्रैच, आरबीआय, ईडी आणि सुप्रीम कोर्टाची बनावट कागदपत्रे व्हॉट्सॲपवर पाठवली. यानंतर डिजिटल अरेस्टच्या नावाखाली त्यांच्याकडून विविध बँक खात्यांत चार कोटी ३८ लाख ६२ हजार २१० रुपये भरण्यास भाग पाडले. दरम्यान, या वृद्धाच्या खात्यातून संशयास्पद व्यवहार झाल्याने बँकेने त्यांचे खाते गोठले होते. त्यामुळे त्यांनी बँकेत संपर्क साधल्यानंतर या प्रकरणात त्यांची फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी नवी मुंबई सायबर पोलीस ठाण्यात धाव घेतली.

त्यानंतर सायबर पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेल्या बँक खात्यांचे विश्लेषण केले असता संशयित आरोपी अनिलकुमार पटेल हा वलसाड (गुजरात) येथील असल्याचे समोर आले. त्याचा पोलिसांनी तपास सुरू केला असता अनिलकुमार याला मुंबई पोलिसांनी डिजिटल अरेस्टच्या दुसऱ्या गुन्ह्यात आधीच अटक केल्याचे व तो न्यायालयीन कोठडीत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार, नवी मुंबई पोलिसांनी त्याला मुंबई पोलिसांकडून ताब्यात घेतले. आरोपीच्या बँक खात्यात फसवणुकीच्या रकमेपैकी ४० लाख २० हजार रुपये जमा झाल्याचे आढळले आहे. ही रक्कम त्याने कुठे वळवली, याचा तपास पोलीस करत आहेत. या गुन्ह्यात पटेल याच्यासोबत आणखी कोण सहभागी आहेत आणि हे जाळे किती मोठे आहे, याचा सखोल तपास पोलीस करत आहेत. ही कारवाई एसीपी प्रेरणा कट्टे, वपोनि विशाल पाटील, पोनि गणेश जाधव, पीएसआय राहुल कोळी आणि त्यांच्या पथकाने केली.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात रस्सीखेच स्पर्धा उत्साहात



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब यांच्या अमृत वर्षनिमित्त जिमखाना कमिटीतर्फे सोमवारी (दि.२) आंतरशालेय व आंतरमहाविद्यालयीन टग ऑफ वॉर (रस्सीखेच) स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे, संस्थेचे सदस्य ॲड. राहुल घरत, प्रभाकर जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. या मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा वाढली. या स्पर्धेत विविध शाळा व महाविद्यालयांतील खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला तसेच खेळाडूंनी सामूहिक ताकद, शिस्त, संयम व क्रीडावृत्तीचे उत्कृष्ट दर्शन घडवले व प्रत्येक सामन्यादरम्यान प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात खेळाडूंना प्रोत्साहन दिले.

कार्यक्रमादरम्यान मान्यवर पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व क्रीडा क्षेत्रातून व्यक्तिमत्त्व विकास घडतो तसेच संघभावना, नेतृत्वगुण व आत्मविश्वास निर्माण होतो, असे मत त्यांनी व्यक्त केले तसेच विजेत्या व उपविजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके व सन्मानचिन्हे प्रदान करण्यात आली. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे व प्रा. प्रथमेश उदेकर समन्वयक, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष यांनी या स्पर्धेचे यशस्वीरित्या आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे व सर्व विजेतांचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये क्रीडासंस्कृती रुजविण्यास तसेच शारीरिक तंदुरुस्तीबाबत जागृती निर्माण करण्यास उपयुक्त ठरल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. या स्पर्धेचे यशस्वी आयोजन क्रीडा समितीचे समन्वयक अजिंक्य भगत व रवींद्र शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले तसेच समितीतील इतर सर्व सदस्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नीलम मोरे यांनी केले तसेच कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांचे आभार मानले.

## हेल्मेट वाटपाच्या माध्यमातून वाहतूक नियम पाळण्याचे आवाहन

**उरण : बातमीदार**

राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाच्या उपक्रमांतर्गत न्हावाशेवा वाहतूक शाखा आणि ICICI Lombard व सेवा सहयोग फाऊंडेशन यांच्या संयुक्त तत्वावधानात एक महत्त्वपूर्ण वाहतुकीचे प्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात १०० हेल्मेटच वाटप करून वाहतुकीच्या नियमांबाबत माहिती देण्यात आली आणि हेल्मेट वाटपाच्या माध्यमातून नागरिकांना जागरूक करण्यात आले.

कार्यक्रमाचे मार्गदर्शक व. पो. नि. वैशाली गलांडे, ICICI Lombard व सेवा सहयोग फाऊंडेशन यांच्या वतीने विनय बर्वे, रेश्मा पट्टम, प्रशांत उपहार यांनी नागरिकांना वाहतुकीच्या नियमांबाबत सविस्तर माहिती दिली. प्रबोधन कार्यक्रमात निम्नलिखित वाहतुकीच्या नियमांबाबत माहिती देण्यात आली तसेच हेल्मेट वापराचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

अठरा वर्षे पूर्ण होण्यापूर्वी कोणीही वाहन चालवू नये. अठरा वर्षे पूर्ण झाल्यावर लर्निंग लायसन मध्ये कोणीही डबल सीट वाहन चालवणार नाही अगर चालवल्यास पक्का लायसनधारक पाठीमागे बसलेला असावा. आपण किंवा आपले आई-वडील वाहन चालवीत असताना हेल्मेट घालणे बाबत सूचना द्याव्या तसेच फोरविलर असेल तर सीट बेल्ट लावणे बाबत सूचना द्याव्या. सिग्नल जंप कोणीही करू नये. रॉंग साईड वाहन चालवणार नाही.

या कार्यक्रमात सुमारे १०० ते १२९ नागरिकांनी भाग घेतला होता. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश नागरिकांना वाहतुकीच्या नियमांबाबत जागरूक करणे आणि त्यांना सुरक्षित वाहतुकीच्या पद्धती शिकवणे हा होता.

ICICI Lombard व सेवा सहयोग फाऊंडेशन यांच्या सहकार्याने राईड टू सेफ्टी हा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमाचा एक भाग म्हणून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे आयोजन करणाऱ्या नाव्हाशेवा वाहतूक शाखा आणि ICICI डेलरीव व सेवा सहयोग फाऊंडेशन नवी मुंबई यांचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांचे सर्वांनी अभिनंदन केले.

या कार्यक्रमाच्या आयोजनामुळे नागरिकांना वाहतुकीच्या नियमांबाबत माहिती मिळाली आणि त्यांना सुरक्षित वाहतुकीच्या पद्धती शिकवल्या गेल्या. या कार्यक्रमाचा परिणाम म्हणून नागरिक भविष्यात सुरक्षित वाहतुकीच्या नियमांचे पालन करतील, अशी आशा व्यक्त करण्यात आली.



## उलवे येथे लाडक्या बहिणींचा मेळावा आणि विविध कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिवसंघर्ष प्रतिष्ठान महिला मंडळ, उलवे शहर यांच्या वतीने रविवारी लाडक्या बहिणींचा मेळावा अत्यंत उत्साहात पार पडला. या कार्यक्रमांतर्गत महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभ, खेळ पैठणीचा आणि लकी ड्रॉ अशा विविध मनोरंजक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला उलवे परिसरातील महिलांनी मोठी गर्दी केली होती.

या मेळाव्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यानो भेट देऊन आयोजकांचे कौतुक केले तसेच समाजसेवा हीच ईश्वर सेवा असून अखिलेश यादव हे काम करत आहेत, असे गौरवोद्गार काढले. या कार्यक्रमाला पनवेल महानगरपालिकेच्या नवनर्वाचित नगरसेविका ममता म्हात्रे यांनीही भेट देऊन शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे नियोजन नेहा यादव आणि राधा गोरीवले यांनी केले होते. हा संपूर्ण सोहळा शिवसंघर्ष प्रतिष्ठान जनसंपर्क कार्यालयात पार पडला. खेळ पैठणीच्या माध्यमातून अनेक महिलांनी आकर्षक बक्षिसे जिंकली, तर लकी ड्रॉमुळे कार्यक्रमात शेवटपर्यंत उत्सुकता कायम होती. शिवसंघर्ष प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, गव्हाण जिल्हा परिषद गटाच्या महायुतीच्या अधिकृत उमेदवार निकिता खारकर, गव्हाण पंचायत समिती गणाच्या उमेदवार जिज्ञासा कोळी, वहाळ पंचायत समिती गणाचे भाजप महायुतीयोचे उमेदवार वितेश म्हात्रे, अखिलेश यादव, नेहा यादव, राधा गोरीवले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## संपादकीय

# नियमांचे पालन आवश्यक

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावादरम्यान सोमवारी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लोकसभेत माजी लष्करप्रमुख जनरल एम. एम. नरवणे यांच्या अद्याप प्रकाशितही न झालेल्या पुस्तकासंदर्भातील उतारे वाचायला सुरूवात केली. देशाच्या सुरक्षेशी संबंधित विषय असल्याने स्वाभाविकच सभागृहात वाद निर्माण झाला. अशातऱ्हेने उतारा वाचणे नियमबाह्य असल्याचे वारंवार सांगूनही राहुल यांनी वक्तव्ये रेटणे सुरूच ठेवले. अखेर सभागृह तहकूब करण्यात आले. संसदेच्या नियमांचे पालन करावेच लागेल हे राहुल गांधी यांना कधी समजणार?

**परिस्थितीने कितीही फटके दिले तरी काही माणसे सुधारण्याचे नाव घेत नाहीत. जनतेने सपशेल नाकारलेले असताना देखील विजेत्याच्या आविर्भावात शहजाद्याप्रमाणे वागणे हा काही जणांचा स्वभावपिंड होऊन बसतो. काँग्रेसचे खासदार राहुल गांधी हे त्याचे राष्ट्रीय पातळीवरील ठळक उदाहरण म्हणावे लागेल. त्यांच्यासारखा विरोधी पक्षनेता लाभणे हे भारतीय संसदीय लोकशाहीचे दुर्दैव म्हणावे की काय असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. त्यांच्याइतके बेजबाबदार वर्तन क्वचितच एखाद्या खासदाराने आजवरच्या संसदीय इतिहासात केले असेल. संसदेच्या सभागृहात वर्तन आणि विचार प्रगल्भ असणे अनिवार्य ठरते. दुर्दैवाने राहुल यांच्याकडे याचा अभाव दिसतो. वारंवार ताकीद मिळूनही त्यांच्यात कुठलीही सुधारणा दिसत नाही. कुठलाही पुरावा हाती नसताना निष्कारण वादग्रस्त विधाने करून प्रसिद्धी मिळावी यासाठी त्यांची केविलवाणी धडपड सुरू असते. संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असून सोमवारी लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावर चर्चा सुरू असताना विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांनी जे अप्रस्तुत भाषण केले, ते सभागृहाचा अपमान करणारे मानायला हवे. राहुल गांधी यांच्या भाषणादरम्यान चांगलाच गदारोळ पहायला मिळाला. राहुल यांनी यावेळी भारत आणि चीन यांच्यातील सीमारेषेचा मुद्दा उपस्थित करत काही प्रश्न विचारले. यासंदर्भात बोलताना माजी लष्करप्रमुख नरवणे यांच्या कथित पुस्तकाविषयीच्या एका लेखाचा दाखला त्यांनी दिला. आश्चर्य म्हणजे असे पुस्तक प्रकाशितच झालेले नाही! देशाची सुरक्षा हा अत्यंत संवेदनशील विषय आहे. त्याची जाहीर चर्चा करण्याला स्वाभाविकच मर्यादा असतात. राहुल गांधी यांनी अप्रकाशित पुस्तकाचा संदर्भ देत सरकारला भारतीय सीमारेषेसंदर्भाने सवाल केला. अशा गंभीर आरोपांना पुराव्याशिवाय सभागृहात मांडता येणार नाही. ज्या पुस्तकाचा हवाला राहुल देत आहेत ते अद्याप प्रकाशितही झालेले नाही असे संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी म्हटले. गृहमंत्री अमित शहा आणि इतर सत्ताधारी सदस्यांनीही हस्तक्षेप करत राहुल गांधींच्या वक्तव्याला विरोध केला. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी संबंधित पुस्तक सभागृहात ठेवण्याचा आग्रह धरला. लोकसभा अध्यक्षांसह अनेक सदस्यांनी नियमांचा दाखला देत राहुल यांना थांबवण्याचा प्रयत्न केला. अखेर राहुल यांनी सभागृहाची दिशाभूल करू नये असे त्यांना बजावत सभागृह मंगळवारपर्यंत तहकूब करण्यात आले. तरीही सभागृहाबाहेर माध्यमांशी बोलतानाही राहुल यांनी राष्ट्रीय सुरक्षेसारख्या गंभीर विषयावर आपल्याला लोकसभेत बोलू दिले जात नाही असा कांगावा केलाच. दरम्यान भारतीय जनता पक्षाने 'एक्स'वर शेअर केलेल्या एका जुन्या व्हिडिओत नरवणे असे म्हणताना दिसतात की डोकलाम वादाच्या काळात भारताने एक इंचही जमीन गमावलेली नाही. देशाच्या सुरक्षेसारख्या गंभीर विषयावर पुराव्यांशिवाय गैरमाहिती पसरवणे अत्यंत अयोग्य आहे. विरोधीपक्ष नेत्याच्या पदाला हे शोभणारे नाही. हे असे किती दिवस चालणार? हे कुठेतरी थांबायला हवे.**

# लक्षाच्या बाजारात हुंड्याचा लिलाव; कायदे कागदावर, वास्तव भयावह



भारतीय संस्कृतीत विवाह पवित्र संस्कार मानला जातो.लग्न म्हणजे दोन मनांचे पवित्र बंधन असायला हवे; लग्न म्हणजे दोन पवित्र आत्म्याचे मिलन.मात्र आज संपूर्ण महाराष्ट्रात लग्नाच्या नावाखाली हुंड्याच्या बोलीचा बाजार भरलेला दिसतो. जनावरांच्या बाजाराप्रमाणे मुलांची किंमत ठरवली जाते आणि मुलींचा अप्रत्यक्ष लिलाव केला जातो, ही बाब अत्यंत विदारक आणि समाजाच्या अपयशाचे द्योतक आहे. 'हुंडा' हा दोन अक्षरी शब्द आजही सुशिक्षित, सुसंस्कृत म्हणवणाऱ्या समाजाला पोखरत आहे.

हुंडा देणे किंवा घेणे हा कायद्याने गुन्हा असतानाही प्रत्यक्षात हा कायदा केवळ कागदावरच असल्याचे चित्र आहे. देशात एखादा टक्का विवाह वगळता उर्वरित बहुतेक विवाह हुंड्याच्या सर्रास देवाण-घेवाणीने होत आहेत. मात्र एवढ्या उघडपणे हा बेकायदा व्यवहार होत असूनही आजपर्यंत हुंडा दिला किंवा घेतल्याचा ठोस गुन्हा क्वचितच नोंदवला गेला आहे. आजवर एकही तथाकथित 'हुंडापती' तुरुंगात गेला नसल्याचे वास्तव चिंताजनक आहे.

नोकरदार, डॉक्टर, अभियंते, प्राध्यापक आणि सरकारी कर्मचारी या तथाकथित उच्चशिक्षित वर्गातही हुंड्याचे दर वाढताना दिसतात. 'मी माझ्या मुलीला हुंडा दिला, त्यामुळे माझ्या मुलासाठी हुंडा घेणारच' हा जणू अलिखित नियमच समाजात रूढ झाला आहे. बदल स्वतःपासून सुरू करावा, असे सांगणारा समाज प्रत्यक्षात निर्णय घेण्याच्या वेळी मागे हटताना दिसतो.हुंड्याच्या मागण्या पूर्ण न झाल्यास नवविवाहितेचा मानसिक, शारीरिक छळ केला जातो. सुरुवातीचे काही दिवस सगळं सुरळीत वाटतं; मात्र नंतर खरा छळ सुरू होतो. यातून अनेक महिलांना आत्महत्येस प्रवृत्त केलं जातं.

आपण महाराष्ट्राला पुरोगामी म्हणतो; मात्र हुंड्याच्या बाबतीत महाराष्ट्रही अपवाद नाही, हे विदारक वास्तव आहे. ती पुरोगामी महाराष्ट्राला लागलेली सामाजिक कीड आहे

या बाबत उरण मधील विविध सामाजिक संस्था संघटनानी चिंता व्यक्त केली आहे. जागतिक बँकेच्या २०२१ मधील अभ्यासानुसार भारतात लग्नात वधूपक्ष वरपक्षापेक्षा सातपट अधिक खर्च करतो. १९६० ते २००८ या काळातील ४० हजार लग्नांच्या अभ्यासातून ९५ टक्के लग्नांत हुंडा दिला गेल्याचे स्पष्ट झाले आहे, जरी १९६१ पासून हुंडा प्रतिबंधक कायदा अस्तित्वात असला तरी.

नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरोच्या 'क्राइम इन महाराष्ट्र' अहवालानुसार दर तासाला एक नववधू हुंडाबळी ठरते. दररोज पाच महिला हुंड्याच्या छळाला कंटाळून आत्महत्या करतात, तर आठवड्याला किमान तीन महिलांच्या हत्येचा प्रयत्न होतो. धक्कादायक बाब म्हणजे, हुंडाबळी प्रकरणात ८६ टक्के आरोपी पुराव्याअभावी सुटतात आणि केवळ दोन टक्के प्रकरणांत शिक्षा होते. त्यामुळे गुन्हेगारांना कायद्याची भीती राहिलेली नाही.

या सगळ्या परिस्थितीत 'स्त्री हीच स्त्रीची शत्रू आहे' हे वास्तवही पुढे येते, कारण हुंडा प्रकरणात अटक झालेल्यांमध्ये २५ ते ३० टक्के महिला असतात. खोटी प्रतिष्ठा, सामाजिक दबाव आणि परंपरेच्या नावाखाली ही अमानवी प्रथा टिकून आहे. कर्जबाजारीपणा, गरिबी, हुंड्यामुळे खोळंबलेलं लग्न आणि समाजाच्या रूढी – या साऱ्यांचा बळी आज अनेक स्त्रिया ठरत आहेत ही एक घटना नसून समाजाचं आरसप्रतिबिंब आहे.

या समस्येवर तोडगा काढण्याची क्षमता सामाजिक व राजकीय नेतृत्वाकडेच आहे. कायद्याची कडक अंमलबजावणी, हुंडाबळी प्रकरणात अजामीनपात्र गुन्ह्यांची तरतूद आणि आत्महत्येला सदोष मनुष्यवध मानण्यासारखे बदल काळाची गरज आहेत.

शेवटी, बदलाची सुरुवात समाजाने आणि विशेषतः तरुणींनी ठाम निर्णय घेऊनच करावी लागेल.हुंडा घेणाऱ्या किंवा अवास्तव मागण्या करणाऱ्या कुटुंबाशी लग्न न करण्याचा निर्णय घेतल्याशिवाय हे चित्र बदलणार नाही.त्यासाठी समाजाच्या मानसिकतेत बदल होण्याची गरज आहे. मी हुंडा घेणार नाही व कोणाला घेऊ देणार नाही असा संकल्प आजच्या तरुणांनी केला व त्या प्रमाणे आचरण केल्यास हुंडा प्रथा नक्कीच बंद होईल यात संशय नाही.

**–विठ्ठल ममताबादे, उरण**

# राष्ट्रीय महिला डॉक्टर्स दिन



प्रत्येक वर्षी ३ फेब्रुवारी हा दिवस 'राष्ट्रीय महिला डॉक्टर्स दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस प्रख्यात वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. एलिझाबेथ ब्लॅकवेल यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो, कारण त्या अमेरिकेत वैद्यकीय पदवी मिळवणाऱ्या पहिल्या महिला होत्या. १८४९ मध्ये त्यांनी आपल्या कर्तृत्वाने महिलांसाठी वैद्यकीय क्षेत्राचे दरवाजे खुले केले आणि समानतेसाठी लढा दिला. आजही महिला डॉक्टरांनी या क्षेत्रात केलेली प्रगती हा दिवस उत्साहाने साजरा करण्यास प्रवृत्त करतो.

महिला डॉक्टर्सच्या संघर्षाचा इतिहास

डॉ. ब्लॅकवेल यांचा मार्ग सुकर नव्हता. त्यांनी केवळ स्वतःच नव्हे, तर इतर महिलांसाठीही वैद्यकीय शिक्षण आणि व्यवसायाच्या संधी निर्माण करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. त्यांनी महिलांना प्रेरणा देत वैद्यकीय संस्थांमध्ये प्रवेश मिळवून देण्यासाठी चळवळ सुरू केली. आज त्यांच्यामुळेच वैद्यकीय क्षेत्रात महिलांची संख्या वाढत आहे.

असे असले तरी, महिलांना अजूनही विविध आव्हानांचा सामना करावा लागतो. २०१६ च्या आकडेवारीनुसार, केवळ ३५% डॉक्टर महिला होत्या, आणि त्यांना पुरुष समकक्षांपेक्षा सरासरी ८% कमी वेतन मिळते. तसेच, अनेक महिला डॉक्टरांनी कार्यस्थळी लिंगभेद आणि अन्यायकारक वागणुकीचा अनुभव घेतला आहे. त्यामुळे, आजही समता आणि न्यायासाठी लढण्याची गरज आहे.

महिला डॉक्टरांच्या योगदानाचा गौरव

या दिवशी संपूर्ण जगभरात महिला डॉक्टरांनी केलेल्या योगदानाचा सन्मान केला जातो. अनेक नामांकित महिला डॉक्टरांनी आपल्या कार्याने समाजावर अमिट छाप सोडली आहे.

**महत्वाच्या महिला डॉक्टरांचे योगदान**

रेबेका ली क्रम्पलर (१८३१–१८९५): अमेरिकेतील पहिल्या आफ्रिकन–अमेरिकन महिला डॉक्टर.

मेरी एडवर्ड्स वॉकर (१८३२–१९१९): अमेरिकन गृहयुद्धात पहिल्या महिला यूएस आर्मी सर्जन, सन्मान पदकप्राप्त.

व्हर्जिनिया अपगार (१९०९–१९७४): नवजात बाळांच्या आरोग्याचे मूल्यमापन करणाऱ्या 'अपगार स्कोअर' प्रणालीच्या निर्मात्या.

राष्ट्रीय महिला डॉक्टर्स दिनाचा उत्सव कसा करावा?

३ फेब्रुवारी रोजी रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये आणि विविध संस्थांमध्ये हा दिवस साजरा केला जातो. सोशल मीडियावर NWPD यांसारख्या हॅशटॅगचा वापर करून महिला डॉक्टरांच्या योगदानाला उजाळा दिला जातो. तसेच, वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या समस्यांवरही चर्चा होते.

राष्ट्रीय महिला डॉक्टर्स दिनाचा इतिहास

या दिवसाची सुरुवात २०१६ मध्ये 'फिजिशियन मॉम्स ग्रुप' आणि 'मेडलिता' या संघटनांनी केली. 'फिजिशियन मॉम्स ग्रुप'ची स्थापना २०१४ मध्ये डॉ. हाला साबरी यांनी केली होती. या संस्थेचे उद्दिष्ट महिला डॉक्टरांना एकत्र आणणे, त्यांना सहकार्य करणे आणि प्रेरणा देणे हे आहे. आज 'पीएमजी नेटवर्क'मध्ये ६५,००० हून अधिक महिला डॉक्टर आहेत.

स्त्रीशक्तीचा उत्सव

राष्ट्रीय महिला डॉक्टर्स दिन हा केवळ महिला डॉक्टरांचा सन्मान करणारा दिवस नाही, तर तो त्यांच्या संघर्षाची आठवण करून देणारा दिवस आहे. या दिवसाच्या निमित्ताने आपण सर्वांनी एकत्र येऊन त्यांच्या योगदानाला मान्यता द्यावी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रयत्न करावेत. (साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# गुगलने थेफ्ट प्रोटेक्शन केले लाँच



गुगलने वापरकर्त्यांसाठी दोन मोठे अपडेट्स लॉन्च केले आहेत. एकीकडे अँड्रॉइडमध्ये मजबूत थेफ्ट प्रोटेक्शन फीचर देण्यात आले आहे, तर दुसरीकडे जीमेलमध्ये आता जेमिनी एआयची एंट्रीही झाली आहे. एक अपडेट फोन चोरी झाल्यास डेटा आणि पैशांचे संरक्षण करण्यावर लक्ष केंद्रित करते, तर दुसरे तुमच्या जीमेल इनबॉक्सला एआय असिस्टंटमध्ये बदलण्यावर भर देते. यांबद्दल जाणून घ्या

पहिले अपडेट; थेफ्ट प्रोटेक्शनमधील ही वैशिष्ट्ये

ओळख तपासणीसाठी पिन पुरेसा नाही

गुगल बायोमेट्रिक सुरक्षेला मजबूत करत आहे. चोरी झाल्यास बँकिंग–फायनान्ससारखे थर्ड–पार्टी प्स उघडण्यासाठी फिंगरप्रिंट/पिन आवश्यक असेल.

रिमोट लॉक आता अधिक सोपे

फोन लॉक करण्यासाठी गुगल अकाउंट लॉगिनची गरज नाही. android.com/lock वर नंबर टाकून फोन लॉक करू शकता.

चुकीचा पिन टाकणे कठीण जर कोणी वारंवार चुकीचा पिन टाकण्याचा प्रयत्न केला, तर फोन आता दीर्घकाळासाठी आपोआप लॉक होईल. थेफ्ट प्रोटेक्शन असे चालू करा

– सेटिंग्समध्ये गूगल सेक्शनमध्ये जा.– आता All Services वर टॅप करा.– Personal device safety मध्ये जा.– Theft Protection निवडा.

– सर्व फीचर्स चालू करा.

दुसरे अपडेट; जीमेलमध्ये एआय जीमेलचे नवीन एआय फीचर्स जाणून घ्याHelp Me Write आणि Suggested Replies (आता मोफत आहेत). यापूर्वी हे फीचर्स फक्त पेड युजर्ससाठी होते, आता सर्व युजर्ससाठी आहेत.

मेल शोधणे प्रश्न विचारण्यासारखे

जीमेलमध्ये आता तुम्ही पूर्ण प्रश्न लिहू शकता. जीमेल ईमेल थ्रेड्समधून माहिती काढून पॉइंट–वाईज सारांश तयार करेल.

एआय इनबॉक्सची सुरुवात

एआय इनबॉक्स तुमचे अलीकडील ईमेल स्कॅन करेल. महत्त्वाचे अपडेट्स, टू–डू आणि अपॉइंटमेंट्सची ऑटोमॅटिक लिस्ट तयार करेल.

# क्रांतिकारक व स्वातंत्र्यसैनिक उमाजी नाईक

आपण जेव्हा भारताच्या इतिहासाची पाने उलटतो तेव्हा इतिहासाच्या अंधार्या गुहेतुन उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या शौर्याची प्रखर किरणे दिसतात. देशावर इंग्रजांची जुलमी राजवट होती साधनसंपत्तीची लूट ,जबरदस्तीने धर्मांतर यामुळे त्रस्त झालेल्या रयतेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी सगळ्याच जाती–जमातींनी संघर्ष केला. या सर्वांमध्ये ब्रिटिश काळात क्रांतीची मशाल पेटवली ते आद्यक्रांतिकारक उमाजी नाईक यांनी! त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त जाणुन घेऊया त्यांच्याविषयी...

उमाजींचा जन्म पुणे जिल्ह्यात पुरंदर तालुक्यातील भिवडी या गावी ७ सप्टेंबर १७९९ रोजी रोजी झाला. दादोजी खोमणे आणि लक्ष्मीबाई हे त्यांचे आई–वडील होते. जेजुरीचे मल्हारी मार्तंड खंडोबा हे उमाजी नाईक यांचे आराध्य दैवत होते. याच ठिकाणावरून त्यांनी इंग्रजांविरुद्ध क्रांतीचा वणवा पेटवला.

१८२१ साली झालेल्या रामोशी समाजाचा इंग्रजांविरुद्ध पहिला उठाव होता. या लढ्याचे नेतृत्व उमाजीनी केले. देशव्यापी क्रांतीचे स्वप्न पाहणारा इंग्रजांना सळो की पळो करून सोडणारा निधड्या छातीचा वीर आद्यक्रांतीकारक म्हणजेच उमाजी नाईक. महाराष्ट्रातील



## निमित्त

रामोशी समाजाची वस्ती ही डोंगरकपारीत असायची, त्यावेळी पुणे, सातारा जिल्ह्यात त्यांची सतरा–अठरा हजार लोकसंख्या असावी. पण या परिसराच्या संसर्गाने लोखंडाचे सुवर्ण बनावे अशी अवस्था या रामोशी समाजाची झालेली पाहायला मिळते. रामोशी समाजाला श्री शिवछत्रपतींचा सहवास मिळाला आणि हिंदवी स्वराज्य स्थापनेत त्यांचा मोलाचा सहभाग होता.


२४ फेब्रुवारी १८२४ आली इंग्रजाच्या कंपनी सरकारला भांबुर्डा येथील कडेकोट बंदोबस्तात असणाऱ्या खजिना उमाजीनी आपल्या सशस्त्र साथीदारांच्या मदतीने लुटला यामध्ये भरपुर ऐवज मिळाला. उमाजींनी इंग्रजाच्या छावण्यांवर हल्ले करण्यास सुरुवात केली त्यांचे खजिना लुटण्याचे सत्र सुरूच राहील्याने इंग्रज त्रस्त झाले.

पूर्वी १८१८ मध्ये उमाजी नाईकांना एक वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. या काळात ते लिहायला वाचायला शिकले आणि सुटकेनंतर त्यांनी इंग्रजविरुध्द संघर्ष तीव्र केला उमाजींनी रयतेच्या साथीने इंग्रजाविरुध्द संघर्ष केला. इंग्रजांनी सासवड–पुरंदरच्या मामलेदारास उमाजी नाईकांना पकडण्याचे आदेश काढायला सांगितले.

उमाजी नाईक यांनी पश्चिम महाराष्ट्र कोकण भागात स्वतःचे राज्य घोषित केले. इंग्रजांना पळवून लावण्याचा निर्धार त्यांनी केला. गनिमीकाव्याने धुमाकूळ घालून उमाजींनी इंग्रजांपुढे मोठे आव्हान निर्माण केले. पुण्याचा कलेक्टर रॉबर्टसन रामोशाच्या या उठावाबद्दल सर्व जनता कोणत्यातरी राजकीय बदलाची वाट पाहत असल्याचे लिहिले होते.

शेवटी उमाजी नाईकांवर राजद्रोहाचा आरोप ठेवत त्यांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. दि. ३ फेब्रुवारी १८३२ रोजी भारतमातेसाठी उमाजी हसत–हसत फासावर गेले. इतरांना दहशत बसावी भारतमातेसाठी बलिदान करणाऱ्या उमाजी नाईकांच्या पवित्र स्मृतीला विनम्र अभिवादन! **(साभार : इंटरनेट)**


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# रोज तीन कप चहा प्यायल्याने वाढेल आयुष्य

जगातील अब्जावधी लोकांचा दिवस चहाने सुरुच करतात. बहुतेक लोकांना दुधाचा चहा आवडतो, तर काही लोक ग्रीन टी पसंत करतात. शतकानुशतके पारंपारिक औषधांमध्ये चहाचा वापर केला जात आहे. अशाच चहा प्रेमींसाठी एक मोठी बातमी आली आहे. दररोज तीन कप चहा प्यायल्याने वृद्धत्वाची प्रक्रिया कमी होते. द लॅन्सेट या प्रतिष्ठित विज्ञान नियतकालिका त्याच्या अहवालासाठी प्रसिद्ध आहे.



चीनमधील सिचुआन युनिव्हर्सिटीने या संदर्भात सुधारणा केल्या. ३७ ते ७३ वर्षे वयोगटातील ५,९९८ ब्रिटिश नागरिक आणि ३० ते ७९ वर्षे वयोगटातील ७,९३१ चीनी नागरिकांचे सर्वेक्षण करून त्यांनी हा निष्कर्ष काढला. असे आढळून आले की जे लोक नियमितपणे चहा पितात, त्यांच्या वृद्धत्वाची प्रक्रिया चहा न पिणाऱ्या लोकांच्या तुलनेत वेगाने कमी होते.

दरम्यान, या संशोधनात सहभागी व्यक्तींना ब्लॅक टी, ग्रीन टी, येलो टीस किंवा पारंपारिक चायनीज ओलोंग चहा पिण्यास सांगितले होते. ते रोज किती चहा पितात याची नोंद ठेवण्यात आली. या व्यक्तींचे शरीरातील चरबी, कोलेस्टेरॉल, रक्तदाब इत्यादी गोष्टींवरील आकडेवारीतून त्यांचं बायोलॉजिकल वय मोजण्यात आलं.

दररोज तीन कप चहा, किंवा ६ ते ८ ग्रॅम चहा पिल्याने वृद्धत्वविरोधी फायदे दिसून आले, संशोधकांनी निष्कर्ष काढला. नियमित चहा पिणाऱ्यांच्या तुलनेत मध्यम चहा पिणाऱ्यांमध्ये वृद्धत्वविरोधी सर्वात मोठे फायदे दिसून आले, असे त्यात म्हटले आहे. चहा प्यायलेल्या सहभागींमध्ये, वृद्धत्वाची प्रक्रिया तुलनेने वेगवान होती किंवा बदल अधिक स्पष्ट होते. म्हणजेच हे संशोधन केवळ 'निरीक्षणात्मक' असल्याने निकालांची नोंद झाली नाही. वृद्धत्वविरोधी फायद्यांचा कोणताही पुरावा हा केवळ किस्सा पुरावा आहे.

संशोधकांनी असं म्हटलं की , या रिसर्चमध्ये त्यांनी चहाच्या प्रकाराची नोंद घेतली नाही. चीनमधील चहा पिणारे आणि ब्रिटनमधील चहा पिणारे यांच्या अहवालातील पर्शियन फरक वांशिक सुधारकांनी स्पष्ट केला आहे. या सोबत गरम चहा पिताय कोल्ड टी यामुळेही निष्कर्षात बदल होत नसल्याने संशोधकांनी सांगितले आहे. विशेष म्हणजे तीन कप चहामध्ये 'कपाची साईजीही संशोधकांनी विचारली नसल्याचे स्पष्ट केले आहे.

# जनतेचे रखवालदार निवडा -आमदार दरेकर

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील करंजखोल येथे नडगाव तर्फे बिरवाडी जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणासाठी राष्ट्रवादी काँग्रेस व भारतीय जनता पार्टी महायुतीच्या वतीने आयोजित जाहीर सभा मोठ्या उत्साहात पार पडली. या सभेत जिल्हा परिषदेचे उमेदवार निलेश महाडीक तसेच पंचायत समिती गणाचे उमेदवार सौ. चैत्राली विनोद दिघे व ॲड. सुरेश जामदार यांच्या प्रचारासाठी महायुतीच्या प्रमुख नेत्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.



या वेळी ना. अदिती तटकरे यांनी २८ तारखेला स्व. अजितदादा पवार यांचे निधन झाल्याने काही दिवस प्रचारात सहभागी होता आले नाही, याबाबत त्यांनी उमेदवारांची जाहीर माफी मागितली. नेतृत्व गमावल्याचे दुःख असले तरी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत महायुती एकसंध असून उमेदवारांच्या पाठीशी खंबीर उभी आहे, हा काळ टीका–टिप्पणीचा नसून संयम, एकजूट आणि शिस्तीने काम करण्याचा आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका सात–आठ वर्षांनंतर होत असून हा भागासाठी अतिशय महत्त्वाचा टप्पा आहे, असे त्या म्हणाल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही स्व. अजितदादांच्या स्मरणार्थ प्रचारसभा रद्द केल्याचा उल्लेख करत, राजकारणाच्या पलीकडील संबंध आणि संवेदनशीलतेचे उदाहरण त्यांनी अधोरेखित केले. विजय मिळवूनच स्व. अजितदादांना खरी श्रद्धांजली अर्पण करता येईल, असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

सभेत ना. प्रवीणभाऊ दरेकर यांनी गावपातळीवरील प्रश्न, अडचणी व जनतेचे सुख–दुःख समजून घेणारे नेतृत्व निवडण्याची ही निवडणूक आहे, असे त्यांनी सांगितले. दडपशाही, गुंडगिरी व दहशतीला उत्तर देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले मतदानाचे शस्त्र वापरण्याचे आवाहन त्यांनी केले.

ना. दरेकर यांनी करंजखोल व परिसरात राबविण्यात आलेल्या विकासकामांचा सविस्तर आढावा घेतला. सोमजाई मंदिर भक्तनिवास, अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा योजना, पर्यटन विकास, शाळा दुरुस्ती, स्मशानभूमी, सभामंडळे, तसेच १७५ कोटी रुपयांचे २०० खाटांचे सुपर स्पेशालिस्ट हॉस्पिटल या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची माहिती त्यांनी दिली. हा खरा विकास असून महाड–पोलादपूर तालुक्याच्या आरोग्य, शिक्षण व पायाभूत सुविधांमध्ये आमूलाग्र बदल घडवणारा आहे, असे ते म्हणाले.

जनतेच्या पैशावर डल्ला मारणारे नव्हे, तर जनतेच्या पैशाचे रक्षण करणारे प्रतिनिधी जिल्हा परिषदेत पाठवायचे आहेत, असे सांगत दरेकर यांनी निलेश महाडीक, चैत्राली दिघे व ॲड. सुरेश जामदार यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन केले.

यावेळी व्यासपीठावर ना. प्रविण दरेकर, ना.अदिती तटकरे, माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप, भाजपा परिषद सदस्य बिपीन महामुणकर, जि.प. उमेदवार निलेश महाडीक, पं.स. उमेदवार ॲड. सुरज जामदार, पं.स. उमेदवार चैत्राली विनोद दिघे, भाजपा जिल्हा सरचिटणीस हेमा मानकर, भाजपाचे नागेद्र राठोड, कृष्णा शिंदे, नगरसेवक सुमित पवार, नगरसेवक सुरज बामने, नगरसेवक अक्षय हेलेकर, राष्ट्रवादी विधानसभा अध्यक्ष राजेंद्र कोरपे, संदिप ठोंबरे, भाजप महिला मोर्चा जिल्हा अध्यक्ष डॉ. मंजुषा कुद्रीमोती, राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



# आमची लढाई विकासाच्याच मुद्द्यावर -ॲड. निलीमा पाटील

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी जोरात सुरू आहे. सर्वच राजकीय पक्ष व नेतेमंडळीसाठी ही निवडणूक सामाजिक राजकीयदृष्ट्या अस्तित्व व प्रतिष्ठा जपणारी बनली आहे. जांभूळपाडा जिल्हा परिषद गट क्रमांक २९मधून खासदार धैर्यशील पाटील यांच्या पत्नी तथा माजी जिल्हा परिषद अध्यक्षा ॲड: निलीमा पाटील निवडणूक रिंगणात उतरल्यात. भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस व आरपीआय युतीच्या माध्यमातून पाटील निवडणुकीला सामोरे जात असून मतदारसंघात त्यांच्या प्रचाराचा झंजावत सुरू आहे.

जांभुळपाडा पंचायत समिती जिल्हा परिषद गणातून सौ.जागृती राजेश मानकर निवडणुकीत नशीब आजमावतायेत. भाजप महायुतीच्या या उमेदवारांना जनतेतून उत्स्फूर्त पाठिंबा व समर्थन मिळताना दिसतेय. अशातच सुधागडात प्रचार आणि प्रसार शिगेला पोहचलाय. आमची लढाई विकासाच्याच मुद्द्यावर असून राज्य आणि देशात सत्तेत असलेल्या भाजप पक्षाकडून विकासाला मोठी चालना मिळालीय, व पुढेही मिळेल असे सांगत सुधागडाच्या विकासात ज्यांच ज्यांच योगदान आहे ती नेतेमंडळी आज भाजप पक्षात आहेत.

आयात उमेदवार असल्याच्या विरोधकांच्या टीकेला निलिमाताई पाटील यांनी प्रत्युत्तर देताना म्हटलंय की ४० वर्षांपासून पाटील कुटुंबियांची सुधागडशी नाळ जुळलीय,सुधागडच्या विकासासाठी आम्ही नेहमीच पुढाकार घेतलाय. भाई मोहन पाटील यांच हे घर आहे. भाई मोहन पाटील यांचे आजोबा , पणजोबा यांचं सुधागडच्या मातीशी इथल्या माणसाशी आपुलकीच जिव्हाळ्याच नात जोडल आहे. ते नात आजही जोडल आहे. गेली १५ वर्ष मी स्वतः राजकारणात आहे, तुमच्या सर्वांच्या, व सुधागड वासीयांच्या आशीर्वादाने मी रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष तसेच अर्थ व बांधकाम सभापती पद भूषविले आहे. मी फक्त तालुक्यापूरती मर्यादित नसून माझं काम जिल्ह्यात आहे. सुधागडच्या प्रत्येक गावात जलजीवन मिशन योजना, तसेच रस्ते, शाळा, आरोग्य, समाजमंदिर व पायाभूत सेवासुविधा देण्याचं काम केलं आहे. आपल्या अनेक विकासात्मक व लोकाभिमुख योजना सत्ताकाळात सुधागडात राबविल्या. त्यामुळे बाहेरचा उमेदवार होऊ शकत नाही, एकूणच सुधागडातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक अत्यंत अटीतटीची व चुरशीची असल्याने येथील राजकीय वातावरण चांगलेच तापलेय. या रणधुमाळीत नेमकं कोण बाजी मारणार हे निकालाअंती स्पष्ट होणार आहे.

# समरभूमी उंबरखिंड येथे ३६५वा विजयोत्सव साजरा

**चौक : प्रतिनिधी**

सह्याद्रीच्या कुशीत चावणी (छावणी) येथील उंबरखिंडीत ३६५ वा विजय दिन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला, यावेळी सकाळी विजय स्तंभाचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून श्रीफळ वाढवून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली,



छत्रपती शिवाजी महाराजांनी मूठभर मावळ्यांना घेऊन २ फेब्रुवारी १६६१ रोजी कारतलब खानाच्या तीस हजार मुघल सैन्यावर प्रचंड मोठा हल्ला करत मुघल सैन्यांचा दारुण पराभर करत या उंबरखिंडीत मोठा विजय मिळवला होता, त्याचे साक्षीदार स्वतः छत्रपती शिवाजी महाराज होते.

छत्रपती शिवाजी महाराज आणि नेताजी पालकर यांच्या कर्तृत्वाला आणि त्यांच्या आठवणींना उजाळा मिळावा यासाठी उंबरखिंड येथे दरवर्षी मोठ्या उत्साहात विजय दिन सोहळा पार पडतो,यावर्षीही ग्रामपंचायत चावणी, ग्रामस्थ चावणी, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती खालापूर आणि शिवदुर्ग मित्र मंडळ लोणावळा यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता,

यावेळी शिवशाहीर वैभव घरत यांचे छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वावार पोवाडे सादर केले, तर शिवाव्याख्याते अँड. विनय दाभाडे यांचे छत्रपती शिवाजी महाराजांविषयी महत्वाचे व्याख्यान झाले, यावेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य नरेश पाटील, खोपोलीचे माजी नगरध्यक्ष डॉ.सुनील पाटील, खालापूरचे पोलीस निरीक्षक सचिन पवार, वावोशी पोलीस स्टेशनचे संतोष आवटी, शिवदुर्ग मित्र मंडळ अध्यक्ष सुनील गायकवाड, चावणी ग्रामपंचायतचे सरपंच बाळासाहेब आखाडे, उपसरपंच सुखदेव भोसले, सदस्य रमेश चव्हाण, सदस्या संगीता चिंचावडे,प्राची पाटील, सखू वाघमारे,ग्रामस्थ गणेश चव्हाण, पोलीस पाटील समीर पाटील, आदिसह अनेक शिवप्रेमी सह शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रोह्याजवळील वरसेमध्ये दागिन्यांची चोरी

**रोहा :** पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ६ ते ३१ जानेवारी दरम्यान मौजे वरसे.ग्रामपंचायत ऑफिसजवळ ता.रोहा यांचे बंद घरात ता.रोहा येथे फिर्यादी यांचे वरसे ता.रोहा येथिल बंद घराच्यादरवाजाची कडी कोयंडा कोणीतरी अज्ञात चोरटयाने हत्याराने तोडून घरात प्रवेश करून घराचे बेडरूममध्ये असलेल्या लोखंडी कपाट तोडून त्यामध्ये ठेवलेले एकूण २,७२,०००/–रुपये किमतीचे दागिने घरुफोडी करुन चोरुन नेले.

# रोहिदास आडे यांच्या कार्याचा राष्ट्रीय स्तरावर गौरव

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील आदिवासी व दुर्गम भागात गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक व प्रबोधनात्मक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे रोहिदास आडे यांना नागपूर येथे आयोजित एज्युकेशन परिषद २०२६ अंतर्गत सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा सन्मान विसावा सोशल फाउंडेशन व रिसर्च पब्लिकेशन अँड बिझनेस मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. चित्रपट टीव्ही सिरीयल क्षेत्रातील प्रसिद्ध कलाकार सुनील गोडबोले, उद्योजक रामरतन हाडे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते रोहिदास आडे यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र वसन्मानपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.



रायगड जिल्ह्यातील आदिवासी भागात राबविण्यात आलेल्या त्यांच्या सामाजिक उपक्रमांचे मोठे योगदान आहे. वारे, धामोते व देवपाडा येथे ग्राम स्वच्छता अभियानात सक्रिय सहभाग घेत शाळा, विद्यार्थी आणि ग्रामस्थांना एकत्र करून स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यात आली. या उपक्रमांतर्गत केलेल्या प्रभावी कामगिरीमुळे संबंधित शाळेला स्वच्छता अभियानात बक्षीस मिळवून देण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहिला. तसेच मुळगाव येथे आदिवासी मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी विशेष पुढाकार घेतला. शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणताना पोषण आहार योजनेंतर्गत काही काळ स्वखर्चाने विद्यार्थ्यांना जेवणाची व्यवस्था करून दिली. शिक्षकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या नियमित उपस्थितीवर भर देण्यात आला.

पनवेल येथे नियुक्ती असतानाही त्यांनी कर्जत तालुक्यातील ग्रामीण व आदिवासी भागातील शैक्षणिक प्रश्नांकडे सातत्याने लक्ष दिले. विशेषतः देवपाडा येथे शैक्षणिक सुधारणा घडवून आणत शाळेच्या भौतिक व शैक्षणिक विकासासाठी प्रयत्न केले.

# माघ पौर्णिमेनिमित्त रेवदंडा येथे मल्हारी मार्तंड पालखी सोहळा उत्साहात



**रेवदंडा : प्रतिनिधी**

माघ पोर्णिमेचे निमित्ताने प्रतिवर्षाप्रमाणे कोळी बांधवाचा मल्हारी मार्तंड पालखी सोहळा रेवदंडा येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

मल्हारी मार्तंड देवाची पालखी संपुर्ण रात्रभर वाजतगाजत, भंडाराची उधळण करण्यात आली. मोठ्या संख्येने कोळी बांधव या मल्हारी मार्तंड पालखी सोहळ्यास सहभागी झाला .

रेवदंडा कोळीवाडी येथील मल्हारी मार्तंड मंदिरातून माघ पोर्णिमेला परंपरांगत पालखी सोहळाचे आयोजन करण्यात येते. यापुर्वी पाटील कुंटूबियाकडे असलेली पालखी सोहळा विधीला सन १९७१ साली रेवदंडा खंडोबा देवालय विश्वस्त कमिटी मार्फत आयोजन करते, या पालखी सोहळ्यास रेवदंडा मोठा कोळीवाडा, मधला कोळीवाडा व पागार कोळीवाडा यांच्या सहभाग असतो.

रेवदंडा मोठा कोळीवाडा मल्हारी मार्तंड खंडोबा मंदिरातून निघालेली पालखी रेवदंडा भैरवी मंदिर हायस्कुल शाळा येथून फिरते ते रेवदंडा पागार कोळीवाडा व मधला कोळीवाडा येथून पुनस्य सकाळी आठ वाजेपर्यंत मंदिरात पोहचते. रेवदंडा तिन कोळीवाडा गाव पाटील महेश पाटील यांचे नेतृत्वाखाली या पालखी सोहळयाचे आयोजन केले जाते.

## वाहतुक नियम भंग ; चार लाख रुपये दंड वसुल

**अलिबाग :** रायगड जिल्ह्यात दि. २ फेब्रवारी रोजी २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक वाहतुकीचे नियम भंग करणा–या एकूण ४०३ इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून ४,१४,५००/–रुपये इतका दंड आकारला आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे पोयंजे, तहसील – पनवेल, जिल्हा – रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे पोयंजे, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र | | | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| | | लावणी लायक | पोटखराबा | खाते क्र.२८१ एकुण क्षेत्र | |
| | | हे.आर.प्रती | हे.आर.प्रती | हे.आर.प्रती | |
| १६५ | १ | ०–६८–०० | ०–०५–०० | ०–७३–०० | १.५० |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०२/०२/२०२६

सही/–
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.
(खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता** – शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे पोयंजे कातकरीवाडी, तहसील – पनवेल, जिल्हा – रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे पोयंजे कातकरीवाडी, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र | | | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| | | लावणी लायक | पोटखराबा | खाते क्र.२८१ एकुण क्षेत्र | |
| | | हे.आर.प्रती | हे.आर.प्रती | हे.आर.प्रती | |
| ३२/१ | १ | ०–४०–०० | ०–००–०० | ०–४०–१० | ०.६८ |
| ३२/२ | १ | ०–४०.३३ | ०–१७–८० | ०.५८.१३ | ०.६३ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०२/०२/२०२६

सही/–
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.
(खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता** – शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे मोर्बे तहसील – पनवेल, जिल्हा – रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे मोर्बे, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र | | | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| | | लावणी लायक | पोटखराबा | खाते क्र.२८१ एकुण क्षेत्र | |
| | | हे.आर.प्रती | हे.आर.प्रती | हे.आर.प्रती | |
| ७०/२ | १ | ०–०४–३० | ०–००–०० | ०–०४–३० | ०.२८ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०२/०२/२०२६

सही/–
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.
(खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता** – शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड येथील **जयवंती सुरेश पाटील व इतर ६** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी मालकी हक्काचे पडताळणी करून खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे मोर्बे, तालुका. पनवेल, जि. रायगड.**

| कब्जेदाराचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| जयवंती सुरेश पाटील<br>कुंदा बाळकृष्ण भगत<br>योगिता बाळकृष्ण भगत<br>राजेश बाळकृष्ण भगत<br>रूपेश बाळकृष्ण भगत<br>सुलोचना लक्ष्मण माळी<br>योगेश बाळकृष्ण भगत | १०४ | १ | १–०८–१०<br>पो.ख. ०–१०–२०<br>**१–१८–३०**<br>**पैकी विक्री क्षेत्र**<br>**०–२४–३०**<br>**हे.आर.चौ.मी** | ३.९३ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम. ओ. यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **२१ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : ०२/०२/२०२६

सही/–
**विजय भगत ॲन्ड असोशिएटस्**
(ॲडव्होकेट ॲन्ड लिगल कन्सलटंट)
शॉप नं. १२८, पहिला मजला, नगरपालिका शॉपींग कॉम्प्लेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड,
मो.९८२०६०७८५७२/९३२२६५२३१९
Email : vijaybhagat43@gmail.com

# हेल्मेटबाबत पोलिसांचे जाणीवजागृती अभियान

## दंडाऐवजी समजूत देत चालकांचे प्रबोधन

**पनवेल : वार्ताहर**

राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान २०२६च्या अनुषंगाने नवीन पनवेल वाहतूक शाखेच्या वतीने पळस्पे फाटा येथे हेल्मेट न वापरणाऱ्या दुचाकीचालकांसाठी जनजागृतीपर आणि माणुसकीचा संदेश देणारा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. झालेल्या या उपक्रमात दंडात्मक कारवाईपेक्षा जनजागृतीवर भर देण्यात आला.



पोलीस उपायुक्त (वाहतूक) तिरुपती काकडे तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त विजय चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश सकपाळ यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. या वेळी हेल्मेट न परिधान करता दुचाकी चालविणाऱ्या ५० मोटरसायकल चालकांना मोफत हेल्मेटचे वाटप करण्यात आले. तसेच प्रत्येक चालकाला गुलाबपुष्प व हेलमेट देत, यापुढे प्रत्येक वेळी मोटरसायकल चालविताना हेल्मेट वापरण्याबाबत स्नेहपूर्वक प्रबोधन करण्यात आले.

बहुतांशी दुचाकी चालक हेल्मेटचा वापर टाळतात. त्यामागे विविध कारणे असतात. काहींना हेल्मेट सोबत घेऊन फिरणे व ते सांभाळणे कंटाळवाणे वाटते, तर काहींच्या मते हेल्मेट घातल्यावर ऐकायला कमी येते किंवा मान इकडे-तिकडे वळविण्यास अडचण होते. अनेकांना हेल्मेट हातात घेऊन किंवा वाहनावर ठेवून फिरण्याचा ताणही वाटतो, मात्र अपघाताच्या वेळी हाच हेल्मेट तुमच्या जीवासाठी ढाल ठरतो, याकडे पोलिसांनी विशेष लक्ष वेधले. रस्त्यावर अपघात होऊन डोके आपटल्यास, हेल्मेट असल्याने मेंदूला थेट धक्का बसत नाही. हेल्मेट नसताना डोक्याला गंभीर मार लागल्यास ब्रेन हॅमरेज होऊन मेंदूमध्ये रक्तस्त्राव होतो. अशा परिस्थितीत अपघातग्रस्त व्यक्ती कोमात जाऊ शकते आणि काही वेळा कोमातून बाहेर न आल्यास मृत्यूही ओढवू शकतो. त्यामुळे हेल्मेट ही केवळ कायदेशीर अट नसून, जीव वाचविणारी सवय असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी पोलीस हवालदार संजय गावडे, जितेंद्र कदम, ज्ञानेश्वर वाघ, आदिनाथ आघाव, श्रेयस जाधव, बाबा काच गुंडे तसेच महिला पोलीस हवालदार प्रियंका पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. वाहतूक पोलिसांच्या या सकारात्मक, समजूतदार आणि मानवतावादी उपक्रमाचे नागरिकांकडून विशेष कौतुक होत आहे.

# उरणमध्ये ट्रेलरखाली चिरडून चालकाचा मृत्यू

**उरण : बातमीदार**

उरण पोलीस ठाण्याच्या हद्दीत धुतुम येथील IOTL कंपनीशेजारील ब्रीजवर जेएनपीटी ते पनवेलकडे जाणाऱ्या लेनवर एका ट्रेलरच्या खाली चिरडून चालकाचा मृत्यू झाला. मृत्यू पावलेल्या व्यक्तीचे नाव बृजभान मुन्डा यादव (वय ३२) असून तो मध्य प्रदेशातील सिधी जिल्ह्यातील भीतरी येथील निवासी होता. तो उरण येथे ट्रेलरचालक म्हणून काम करत होता.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, बृजभान यादव याने रात्री १ वाजण्याच्या सुमारास त्याच्या ताब्यातील ट्रेलर (एमएच-४६-बीयू-४२९९) हा धुतुम येथील IOTL शेजारील ब्रीजवर जेएनपीटी ते पनवेलकडे जाणाऱ्या लेनवर उतारावर थांबवला होता. त्याने ट्रेलरचा हॅन्डब्रेक न लावता ट्रेलरमधून खाली उतरून ट्रेलरच्या समोर गेला



असता, ट्रेलर उतारावर असल्याने आणि त्यावर भरलेला कंटेनर असल्याने वजनामुळे ट्रेलर पुढे गेला आणि बृजभान यादव याच्या अंगावरून जाऊन तो गंभीर जखमी झाला.

बृजभान यादव याला उपचारासाठी जवळच्या हॉस्पिटलमध्ये नेले असता त्याचा मृत्यू झाल्याची पुष्टी झाली. उरण पोलीस ठाण्यात या घटनेचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक संजय साबळे यांच्यावर तपासाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

# मानव तस्करीविरोधात पनवेलमध्ये वॉक फॉर फ्रीडम रॅलीद्वारे जनजागृती



**पनवेल : वार्ताहर**

मानव तस्करीसारख्या गंभीर सामाजिक समस्येविरोधात जनजागृती निर्माण करण्यासाठी भागूबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉ, पनवेल येथे सकाळी 'वॉक फॉर फ्रीडम' ही मूक रॅली उत्साहात पार पडली.

या रॅलीत महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, स्वयंसेवक तसेच नागरिक सहभागी झाले होते. राष्ट्रीय पातळीवर मानव तस्करी निर्मूलनासाठी राबविण्यात येणाऱ्या चळवळीचा एक भाग म्हणून भारतातील ३० हून अधिक ठिकाणी ही रॅली एकाच वेळी आयोजित करण्यात आली होती. पनवेल येथील रॅलीत १०० हून अधिक नागरिकांनी सहभाग नोंदवला.

या मूक रॅलीचे उद्घाटन महाविद्यालयाचे अध्यक्ष आर. व्ही. येले, मुख्य कार्यक्रम अधिकारी आकाश पाटील व एनएसएस कार्यक्रम अधिकारी रूपेश माने यांच्या हस्ते करण्यात आले. रॅलीदरम्यान सहभागी विद्यार्थी हातात मानव तस्करीची भयावह वास्तवता मांडणाऱ्या घोषणा असलेले फलक घेऊन एकाच रांगेत शांततेत मार्गक्रमण करत होते. मूक स्वरूपातील ही रॅली तस्करीच्या बळी ठरलेल्या, आवाज गमावलेल्या पीडितांप्रती एकजूट आणि संवेदनशीलतेचे प्रतीक ठरली. रॅलीची सुरुवात महाविद्यालय परिसरातून होऊन खांदा कॉलनी मंदिरापर्यंत झाली व त्यानंतर पुन्हा महाविद्यालयात समारोप झाला.

रॅलीपूर्वी सहभागी विद्यार्थ्यांना मानव तस्करीची लक्षणे ओळखणे, संशयास्पद बाबी लक्षात आल्यास तत्काळ मदत कशी मिळवावी, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच १०९८ (चाइल्डलाईन), १८१ (महिला हेल्पलाईन) व १९३० (सायबर गुन्हे) या राष्ट्रीय मदत क्रमांकांची माहिती देऊन नागरिकांनी मोबाईलमध्ये सेव्ह करण्याचे आवाहन करण्यात आले.



# पनवेल मनपा लोकशाही दिनात नागरिकांच्या तक्रारींचे निवारण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्व सामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी पनवेल महापालिकेच्या मुख्यालयातील बैठक कक्षामध्ये सोमवारी (दि.२) आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गादर्शनाखाली लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले. या बैठकित नागरी सेवा सुविधा विभाग व इतर विभागाचे पाच अर्ज दाखल झाले होते, या अर्जाची दखल घेऊन नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यात आल्या.

या कार्यक्रमास परिवहन विभाग व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त मंगला माळवे, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे, प्रभाग अधिकारी, सामान्य प्रशासन विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नागरिकांच्या तक्रारी, अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांमध्ये संवादवाढीसाठी महापालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे. नागरिकांनी आपले वैयक्तिक अर्ज समन्वय अधिकाऱ्यांकडे पंधरा दिवस आधी द्यावेत. संबंधित नागरिकांनी लोकशाही दिनादिवशी उपस्थित रहावे, असे महापालिकेच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

# सुकापूर येथे भाजप महायुतीचा प्रचार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल तालुक्यात भाजप महायुतीने प्रचाराचा जोर वाढवला आहे. याचाच एक भाग म्हणून पाली देवद जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार प्राची जाधव, पाली देवद पंचायत समिती गणाच्या उमेदवार वैशाली सावंत आणि विचुंबे पंचायत समिती गणाच्या उमेदवार नीलम भिंगारकर यांच्या प्रचारार्थ सुकापूर येथून भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

रॅलीच्या मार्गावर ठिकठिकाणी ग्रामस्थांनी उमेदवारांचे स्वागत केले. या रॅलीला लाभलेला उदंड प्रतिसाद पाहता, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे तिन्ही उमेदवार विक्रमी मताधिक्याने विजयी होतील, असा ठाम विश्वास महायुतीच्या नेत्यांनी यावेळी व्यक्त केला. रॅलीदरम्यान कार्यकर्त्यांनी दिलेल्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

या वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, भाजप नेते राजेश पाटील, विनोद पाटील, अनंता गायकवाड, मयूर शेळके यांच्यासह भाजप महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या तिन्ही उमेदवारांनी घरोघरी जाऊन मतदारांच्या भेटी घेण्यावर भर दिला असून, महायुतीने केलेल्या विकासकामांच्या जोरावर आम्ही जनतेचा आशीर्वाद मिळवू, असा आत्मविश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला.



# दि रयत सेवक को.ऑप. बँकेला पुरस्कार प्रदान

**उरण : रामप्रहर वृत्त**

दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा या बँकेला ई-प्लस मीडिया आणि नागरी सहकारी बँका यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा मानाचा 'आयकॉनिक लीडर्स अवॉर्ड' प्रदान करण्यात आला. बँकिंग टेक प्रोजेक्ट अंतर्गत तंत्रज्ञान क्षेत्रातील उल्लेखनीय प्रगतीबद्दल बँकेचा हा गौरव करण्यात आला आहे.

मुंबई-पुणे एक्सप्रेस वे वरील हॉटेल नोवोटेल (इमॅजिका) येथे शनिवार, ३१ जानेवारी २०२६ रोजी हा दिमाखदार सोहळा पार पडला.



बँकेच्या वतीने दि रयत सेवक को ऑप बँकेचे संचालक किशोर पाटील, जनरल मॅनेजर दत्तात्रय काकडे कर्ज विभागप्रमुख सुनील महाजन, वआयुषी कुलकर्णी यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

ई-प्लस मीडिया व नागरी सहकारी बँका यांच्या वतीने बँकिंग क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर प्रभावीपणे करणाऱ्या बँकांना प्रोत्साहित करण्यासाठी या पुरस्कारांचे आयोजन केले जाते. सातारा जिल्ह्यातील अग्रणी बँक असलेल्या रयत सेवक बँकेने ग्राहकांसाठी राबवलेल्या डिजिटल सुविधा आणि बँकिंग तंत्रज्ञानातील बदलांची दखल घेऊन या पुरस्कारासाठी बँकेची निवड करण्यात आली.

या यशामुळे बँकेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, सातारा जिल्ह्यासह सहकार क्षेत्रात बँकेचे कौतुक होत आहे. या यशाबद्दल बँकेचे चेअरमन व्हाइस चेअरमन, सर्व संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी आनंद व्यक्त केला असून सभासद व ग्राहकांनीही अभिनंदन केले आहे.

# बीज देवाण-घेवाण दिवस नवी मुंबईत साजरा



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या 'माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत नागरिकांच्या सहयोगाने विविध उपक्रम राबविले जात आहेत.

त्या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बीज देवाणघेवाण दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका उद्यान विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यात आले. अति.आयुक्त डॉ.राहुल गेठे, उद्यान विभाग उपायुक्त स्मिता काळे यांच्या नियंत्रणाखाली, महापालिका क्षेत्रातील विविध उद्यानांमध्ये बीज देवाण-घेवाण व संकलन आणि बीजगोळा निर्मिती प्रशिक्षण असे विविध उपक्रम राबविण्यात आले.

हे उपक्रम शहरातील विविध उद्यानांमध्ये राबविण्यात आले. यामध्ये - बेलापूर विभागात डॉ. केशव हेगडेवार उद्यान सेक्टर १ सीबीडी बेलापूर (मँगो गार्डन), घणसोली विभागात सेंट्रल पार्क सेक्टर से- ३ घणसोली, कोपरखैरणे विभागात सेक्टर १४ येथील निसर्ग उद्यान, वाशी विभागात स्व.राजीव गांधी उद्यान से- २९ वाशी, ऐरोली विभागात स्व. राजीव गांधी उद्यान से- ३ ऐरोली, तुर्भे विभागात संवेदना उद्यान से-१० सानपाडा तसेच कोपरखैरणे येथील नमुंमपा शाळा क्र. ३१ व शाळा क्र. ३६ येथे लोकसभागातून उत्साहात झाले.

आजच्या विशेष दिवसाचे औचित्य साधून नागरिकांना व विद्यार्थ्यांना पर्यावरण जागृतीचा संदेश व बीज गोळे तयार करणेबाबत प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये नवी मुंबईतील नागरिक, बचतगटातील महिला, विद्यार्थी, महाविद्यालयांच्या एनएसएस युनिटमधील विद्यार्थी, वृक्षप्रेमी नागरिक, ज्येष्ठ नागरिक, विविध पर्यावरण प्रेमी संस्था, सेवाभावी मंडळे, नवी मुंबई महानगरपालिका उद्यान विभागातील अधिकारी-कर्मचारी यांनी सर्व ठिकाणी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

या बीज देवाण-घेवाण उपक्रमामध्ये प्राधान्याने देशी वृक्षांच्या बीजांचेच आदान प्रदान करण्यात आले. चिकू, फणस, जाम, पेरू, चिंच, सिताफळ, जांभूळ, आवळा, स्टार फ्रूट आणि आंबा, यासारख्या झाडांच्या बियांचे देवाणघेवाण करणे हा कार्यक्रम राबविण्यात आला. तसेच बीजगोळे तयार करण्याचे प्रशिक्षणही देण्यात आले.

या कार्यक्रमांतर्गत माता अमृतानंदमयी मठ नेरूळ या संस्थेमार्फत भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी येथील एनएसएसचे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक देण्यात आले. तसेच कोपरखैरणे येथील महिला बचत गट, इच्छापूर्ती श्री गणेश मंडळ कोपरखैरणे व क्राईस्ट कॅडमी स्कुल सेक्टर २३ कोपरखैरणे येथील ५० विद्यार्थ्यांसह वृक्षप्रेमी नागरिकांच्या सहभागातून बीज गोळे तयार करणेबाबत प्रशिक्षण देण्यात आले.

# संदीप घोडके उत्कृष्ट नोडल अधिकारी म्हणून सन्मानित

**उरण : वार्ताहर**

भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त उरण तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील वीर वाजेकर



महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ संदीप घोडके यांच्याबद्दल उल्लेखनीय कार्य केल्याची माहिती प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सांगितली. यानुसार डॉ संदीप घोडके, सहकारी, विद्यार्थी व राज्यशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांच्या लोकशाही, निवडणूक प्रक्रिया व मतदार जागृती या क्षेत्रातील सातत्यपूर्ण कामगिरीनिमित्त डॉ घोडके यांना शासकीय कार्यक्रमात खास निमंत्रित करून सन्मानित करण्यात आले.

डॉ.संदीप घोडके यांनी राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी, मुंबई विद्यापीठ विभागीय समन्वयक व DLLE प्रमुख म्हणून यापूर्वीही तालुक्यात मतदानाची टक्केवारी वाढविण्यात या उपक्रमांचा सहभाग असल्याचे जाहीर निवेदन प्रांत अधिकारी श्रीमती अश्विनी पाटील यांनी यापूर्वीच महाविद्यालयात येऊन केले होते तसेच विभागीय आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर यांनीही यापूर्वीच डॉ घोडके यांचा राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त सत्कार केला होता आणि आता यावर्षी रायगड जिल्हा निवडणूक अधिकारी नितीन वाघमारे यांनी डॉ घोडके यांच्या याविषयीच्या प्रबोधन कार्याची दखल घेऊन सध्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याद्वारे पुन्हा सन्मानित केले आले आहे.

अशा पद्धतीने राजापूर, पनवेल, उरण या क्षेत्रात सदृढ लोकशाहीकरिता निवडणूक प्रक्रियेची मूल्ये समाजामध्ये रुजविण्याच्या कामी डॉ.घोडके यांच्या अशा योगदानामुळे व सन्मानानिमित्त रयत शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, रयत सेवक, विद्यार्थी, मित्रपरिवार व आप्तेष्ट यांच्याकडून प्रा. डॉ संदीप घोडके यांचे अभिनंदन होत आहे.

## भाजप महायुतीचा प्रचार



**पनवेल : वडघर जिल्हा परिषद गटाच्या महायुतीच्या उमेदवार सोनाली जितेकर आणि करंजाडे पंचायत समिती गणाच्या उमेदवार रंजना वास्कर यांच्या विजयासाठी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी करंजाडे ओरियाना सोसायटी येथे जाऊन प्रचार केला. या वेळी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

# नवी मुंबई सुवर्णकार महिला मंडळातर्फे हळदीकुंकू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळ(रजि.)नवीन पनवेल संचलित नवी मुंबई महिला मंडळ सुवर्णसखी वतीने रथसप्तमीचे औचित्य साधून आयोजित महिला हळदी-कुंकू व तिळगूळ समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

हा पारंपरिक व सांस्कृतिक कार्यक्रम नवी मुंबई सुवर्णकार महिला मंडळाच्या पदसिद्ध अध्यक्षा संगीता धनराज विसपुते तसेच सचिव निलम विसपुते यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाच्या कार्यालयात- सेक्टर वन/एस, प्लॉट नं. १३६/बी, शबरी हॉटेलजवळ, नवीन पनवेल येथे आयोजित करण्यात आला होता.

हळदी-कुंकू हा सौभाग्य, समृद्धी आणि स्त्रीशक्तीचे प्रतीक मानला जातो.



महिलांमधील स्नेह, आपुलकी व सामाजिक ऐक्य वृद्धिंगत करणारा हा पारंपरिक सोहळा असल्याने सुवर्णकार समाजातील महिला भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. संक्रांती व रथसप्तमीच्या निमित्ताने सुवासिनींना तीळगूळ व वाण देण्यात आले.

रथसप्तमी हा सूर्यदेवाच्या पूजेचा पवित्र दिवस असून या दिवशी सूर्यदेव उत्तरायणाची गती धारण करतात. आरोग्य, तेज व समृद्धीसाठी या दिवसाला विशेष महत्त्व असल्याचे मानले जाते. कार्यक्रमादरम्यान महिलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन, विविध खेळ, तसेच महिलांनी थाटलेले स्वादिष्ट खाद्यपदार्थांचे स्टॉल्स यामुळे संपूर्ण वातावरण आनंदमय व उत्साही झाले. सर्व उपस्थित महिलांनी मनमुराद आनंद लुटला.

या वेळी नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळाचे अध्यक्ष सी. डी. मोरे, कार्याध्यक्ष दादासाहेब धनराज विसपुते, सचिव विजयजी भामरेसाहेब, ज्येष्ठ सदस्य उदय विभांडिक, पाडुरंग सोनार आणि राजेश विभांडिक तसेच सुवर्णकार समाजातील महिला भगिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या. हा समारंभ सामाजिक एकोपा, सांस्कृतिक परंपरा आणि स्त्रीशक्तीचा गौरव करणारा ठरला.

# सुधागड तालुक्यात भाजपचा झंझावात

## अडुळसे ग्रामस्थांनी केला जाहीर प्रवेश

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात भारतीय जनता पार्टीची संघटनात्मक घौडदौड वेगाने सुरू आहे. ऐन जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या रणधुमाळीत भाजप पक्षाला उभारी मिळताना दिसत आहे. सुधागडात भाजपकडून विरोधी राजकीय पक्षांना एकापाठोपाठ धक्के दिले जात आहेत.

अडुळसे येथील शेतकरी कामगार पक्ष, शिवसेनेच्या पारंपरिक मतदारसंघाला भारतीय जनता पक्षाने मोठा धक्का दिला आहे. गावातील असंख्य कार्यकर्त्यांनी शेकाप, शिंदे शिवसेनेला रामराम करीत सोमवारी (दि.२) भाजपचे कमळ हाती घेतले आहे. त्यामुळे या पक्षप्रवेशाने शेतकरी कामगार पक्ष, शिंदे शिवसेनेला सुरुंग लागला आहे, तर भाजपचे कमळ अधिक तेजीत फुलले आहे.

या सर्व प्रवेशकर्त्या कार्यकर्त्यांचे भाजप रायगड जिल्हाध्यक्ष तथा खासदार धैर्यशील पाटील, भाजप नेते प्रकाश देसाई, माजी जि. प सदस्य, भाजप नेते रवींद्र देशमुख, मिलिंद देशमुख, माजी पंचायत समिती सभापती रमेश साळुंके, आरिफ मणियार, नरेश खाडे, सचिन भोईर यांनी स्वागत केले. खासदार धैर्यशील पाटील म्हणाले की, ज्या अपेक्षेने विश्वासाने पक्षप्रवेश केला तो विश्वास कायम टिकवून ठेवला जाईल, राज्य आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून जो जो आपल्याला अपेक्षित विकास आहे ती विकासकामे येत्या काळात करू, विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही खासदार धैर्यशील पाटील यांनी दिली.



### यांनी हाती घेतले 'कमळ'

ग्रामपंचायत सदस्य विवेक तेलंगे, युवा सेना विधानसभा अध्यक्ष, माजी उपसरपंच किरण पिंपळे, प्रसाद पिंपळे, मारुती पिंपळे, अमृत पोंगडे, विलास पोंगडे, रघुनाथ खाडे, दीपक पिंपळे, प्रकाश कदम, दीपक कदम, नामदेव कदम, नितीन कदम, संदीप मोरे, भगवान मोरे, महेश मोरे, श्याम मोरे, सुनील कदम, बंडू पोंगडे, राजाराम कदम, वसंत पिंपळे, जनार्दन दळवी, संजय पोंगडे, सचिन कदम, मंगेश कदम, शरद घोलम, सुहास पिंपळे, तुकाराम पिंपळे, गोविंद कदम, सचिन कदम, विजय कदम, सुरेश पोंगडे, शिवराम कदम, अशोक वाटवे, विनोद कदम, रविन्द्र किजवड़े, कृष्णा पोंगड़े, अंबाजी पोंगड़े, संतोष कदम, मानव पिंपळे, ज्ञानेश्वर कदम, गोविंद पवार आदींसह ग्रामस्थांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

# महिला उद्योग मंडळाच्या प्राथमिक शाळेच्या नवीन इमारतीचे उद्घाटन

**मोहोपाडा, रसायनी : प्रतिनिधी**

रसायनी परिसरातील महिला उद्योग मंडळाची प्राथमिक शाळा पराडे या शाळेच्या नवीन इमारतीचा उद्घाटन सोहळा सोमवारी (दि.२) उत्साहात झाला.

या उद्घाटनावेळी वासांबे ग्रामपंचायत सरपंच उमा मुंढे, आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे मावळ लोकसभा प्रसिध्दी प्रमुख राकेश खराडे, उरण विधानसभा अध्यक्ष जनार्दन मालुसरे, आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे खालापूर तालुका अध्यक्ष प्रशांत तांबोळी, आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे गोरक्षक विभाग अध्यक्ष मलेश गुडसे, संजीवनी शाळेच्या संचालिका सावळेकर मॅडम, सदस्या सहस्त्रबुद्ध मॅडम, महिला उद्योग मंडळाच्या अध्यक्षा सरोजिनी साजवान, सचिव सुनंदा कुलकर्णी, उपाध्यक्ष शारदा दराडे, सदस्या हर्षदा पालव, शोभा देऊळगावकर, शाळेचे मुख्याध्यापक महादेव पाटील तसेच सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा करण्यात आला.



सरपंच उमा मुंढे यांच्या हस्ते इमारतीचे उद्घाटन करण्यात आले, तर आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे मावळ लोकसभा प्रसिध्दीप्रमुख राकेश खराडे यांच्या हस्ते नारळ वाढविण्यात आला. वर्गखोल्यांचे अनावरण आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे उरण विधानसभा अध्यक्ष जनार्दन मालुसरे यांच्या हस्ते करण्यात आले.

महिला उद्योग मंडळाच्या शाळेच्या या इमारतीचे बांधकाम अतिशय सुंदर मोठे प्रशस्त वर्ग सर्व सुविधांनी असे तयार झाले आहेत. पटसंख्या जास्त असल्याकारणाने इयत्ता ५वी ते ८वी चे वर्ग सकाळ सत्रात व १ली ते ४थी चे वर्ग दुपार सत्रात भरविण्याचा शुभारंभ याच दिवसापासून करण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक महादेव पाटील यांनी शाळेविषयी मनोगत व उपस्थित अतिथींचे ऋण आपल्या भाषणातून व्यक्त केले.

# रायगडातील तीन गायकांनी भजन संमेलनात जिंकली मने

**मुरूड : प्रतिनिधी**

अखिल भजन सांप्रदाय हितवर्धक मंडळ आयोजित अखिल भारतीय भजन संमेलन यशवंत नाट्य गृह माटुंगा मुंबई येथे आयोजित करण्यात आले होते. या भजन संमेलनात सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, मुंबई, ठाणे, आदी जिल्ह्यांमधून या संमेलनात भजन गायक समाविष्ट झाले होते.

या संमेलनात नृत्याविष्कार, नाटिका, लयकारी मृदुंग वादन, भजनाची कार्यशाळा, चालला नामाचा गजर, आदी कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये मुरूड तालुक्यातील खारीकवाडा परिसरातील अजय राऊत यांनी उत्कृष्ट अभंग सादर केला. आलाप, हरकती, आपल्या सुमधुर आवाजातून सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.



या संमेलनात रायगडमधून अजय राऊत बुवा, भारती मडवी बुवा, अजय शिंदे बुवा यांनी उत्कृष्ट सादरीकरण करून प्रेक्षकांची मने जिंकली. रायगड जिल्ह्यामधून या तीन कलाकारांची संमेलनात चमकदार कामगिरी केली आहे. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष भगवान लोकरे, संमेलन अध्यक्ष योगी निरंजन नाथ गुरूशांतीनाथ महाराज विश्वस्त आळंदी, संमेलन उद्घाटक महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिकमंत्री आशिष शेलार, भजन सम्राट रामदास कासले, श्रीधर मुणगेकर, भगवान लोकरे आदी मान्यवर यांच्या हस्ते शाल श्रीफळ, सन्मानचिन्ह व रोख रक्कम देऊन या तिघांना गौरवण्यात आले आहे.

# खालापूर तालुक्यातील १७ ग्रामपंचायतींची उत्कृष्ट कामगिरी


**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्याने राज्यस्तरीय PAI 2.0 (Performance Assessment Index) उपक्रमात उल्लेखनीय यश संपादन केले असून तालुक्यातील तब्बल १७ ग्रामपंचायतींनी उत्कृष्ट कामगिरी करत राज्यात टॉप शंभरमध्ये स्थान मिळवले आहे. हे यश मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) विशाल तनपुरे व गटविकास अधिकारी संदीप कराड यांच्या कुशल मार्गदर्शनामुळे आणि विस्तार अधिकारी पंचायत शैलेंद्र तांडेल व विनोद चांदोरकर यांच्या सनियंत्रणामुळे शक्य झाले आहे.

PAI २.० अंतर्गत प्रशासनिक पारदर्शकता, आर्थिक शिस्त, सेवा वितरण, नागरिक सहभाग आणि विकासकामांची प्रभावी अंमलबजावणी या निकषांवर ग्रामपंचायतींचे मूल्यमापन करण्यात आले. या सर्वच बाबींमध्ये खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायतींनी सातत्यपूर्ण आणि गुणवत्तापूर्ण कामगिरी केली. गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी ग्रामसेवक, सरपंच, सदस्य व पंचायत कर्मचाऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करून नियोजनबद्ध कामकाजावर भर दिला. तसेच ऑनलाईन नोंदी, वेळेत अहवाल सादरीकरण व योजनांची प्रभावी अंमलबजावणी यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले.

या यशाबद्दल तालुक्यातील ग्रामपंचायती खरिवली, शिरवली, नावंढे, दुरशेत, जांबरुंग, नडोदे,. चौक, तांबाटी, चावणी, चांभार्ली, साजगाव, टेंभरी, लोधिवली, वडगाव,उंबरे, गोरठण बुद्रुक व माडप ग्रामपंचायतीचे सर्वत्र कौतुक होत असून, खालापूर तालुक्याचा प्रशासनिक कार्यक्षमतेचा आदर्श इतर तालुक्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# कृष्णा वर्तक गुरुजींचे शैक्षणिक मार्गदर्शन



**पेण : प्रतिनिधी**

कर्मचारी सेवानिवृत्त झाले की घरी बसतात व आपल्या कौटुंबिक जीवनात रमतात पण याला अपवाद आहेत ते रामवाडीचे हभप कृष्णा वर्तक गुरुजी गेली १५ वर्ष दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांना भेटी देऊन त्यांना मार्गदर्शन करतात. रामवाडी समर्थनगर येथील क्लासेसला भेट देऊन दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन केले.

शाळेत दिलेल्या शिक्षणाबरोबर अनेक शैक्षणिक पैलू विद्यार्थ्यांना समजून सांगितले. परीक्षेच्या काळावधीत विद्यार्थ्यांनी सावध कसे असावे, विद्यार्थ्यांचे ध्येय काय असावं, शैक्षणिक पद्धत कोणती असावी, स्वतः चा वेळापत्रक कसा असावा, परीक्षेच्या काळावधीत नेमकं कोणता अभ्यास करावा, आदर्श पेपर म्हणजे काय, पास होण्यासाठी सोप्या आयडिया, जीवनमूल्ये म्हणजे काय, विद्यार्थ्यांचा देव कोणता, त्याची पूजा कशी करावी, अनेक ऐतिहासिक उदाहरण देऊन वर्तक हे विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करून शैक्षणिक दिशा देऊन ध्येयापर्यंत कसं जावं याचे मार्गदर्शन करतात.

आदर्श केंद्रप्रमुख म्हणून रायगडजिल्हा गौरव हि त्यांच्या कार्याची पावती आहे. वर्तक गुरुजींचे मार्गदर्शन हे विद्यार्थ्यांसाठी दिशा देणारे व जीवन बदलणारे आत्मचिंतन आहे असे उदगार या वेळी दिलीप म्हात्रे यांनी काढले. शेवटी विद्यार्थ्याला लेखन साहित्य देवून त्यांनी शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आवक घटल्याने मासळीचे भाव वधारले; कोळी बांधव चिंतेत

## सामान्य नागरिकांना मासळीचा स्वाद दुरावला

**मुरूड : प्रतिनिधी**

माघ पौर्णिमेस जेजुरीच्या खंडोबाची यात्रा असल्याने मुरूड तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यावर असणाऱ्या गावांना मासळीचा मोठा फटका सहन करावा लागत आहे.

रायगड जिल्ह्यातील मुरूड, अलिबाग, श्रीवर्धन, उरण, म्हसळा आदींसह अनेक तालुक्यांना मासळी तुटवड्यामुळे उपलब्ध मासळी किमतीत मोठ्या पटीने वाढ झाल्याने सर्वसामान्य नागरिकांना मासळी परवडेनाशी झाली आहे.

कोकणातील ७२० किलोमीटर सागरी किनारा असून बहुसांख्य लोक समुद्रातून मासेमारी करून आपला उदरनिर्वाह करीत आहेत. समुद्रकिनारी राहणारे कोळी बांधव हे धार्मिक व श्रद्धाळू सुद्धा आहेत. एक वर्ष बाजूला सारून संपूर्ण रायगड जिल्ह्यातील कोळी समाज बांधव माग पौर्णिमेस जेजुरीच्या खंडोबाची यात्रा असल्याने मोठ्या संख्येने जेजुरी गडावर जाऊन आपल्या कुलदैवताला भेटावयास जाण्याची परंपरा आहे. सर्व भाविक कोण पायी दिंडी काढून तर मोठमोठ्या ट्रॅव्हल्स बस बुक करून जेजुरी येथे खंडोबाच्या दर्शन मोठी गर्दी करीत आहेत. किमान एक आठवडा हा देवदर्शनाचा कार्यक्रम सुरू असल्याने अगोदरच सर्व तयारी करून जेजुरी गाठण्याचा उपक्रम ठरत असतो.



खंडोबाच्या दर्शनाला सर्व कोळी बांधव गेल्यामुळे सर्व बोटी किनाऱ्याला साकारलेल्या दिसून येत आहेत. बोटी खोल समुद्रत न गेल्याने मुरूडसह अनेक ठिकाणी मासळीची आवक घटल्याने मासळीचे भाव कमालीचे वधारले आहेत. उपलब्ध मासळी फारच थोड्या प्रमाणात मिळत असल्याने भाव मोठ्या प्रमाणात वाढल्याने सर्वसामान्य नागरिक मासळीपासून दूर झाले आहेत.

सध्या बाजारात एक सुरमई नग १६०० रुपये तर पापलेट मिडीयम साईज एक जोडी ७०० रुपये भाव आकारला जात आहे. सर्व मासळी मोठ्या पट्टीत वाढ झाल्याने पर्यटक व सामान्य ग्राहक याना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. ज्यावेळी मोठ्या संख्येने बोटी मासळी मारावयास जातील व मासळीची आवक वाढेल तेव्हाच मासळीचे दर कमी होणार आहेत. सुरू असणारा हा आठवा संपल्यावर समस्त कोळीबांधव आपल्या घरी परतल्यावर बोटी खोल समुद्रात जाणार आहेत. तोपर्यंत मासळीची आवक कमी राहणार असून मासळीचे दर मोठ्या किमतीत राहणार आहेत. खोल समुद्रात जाऊन आठ ते दहा दिवस राहून सुधा मुबलक मासळी मिळत राहिल्यास मासळीचे भाव कमी होण्यास मदत होणार आहे.

**सध्या आमचे कोळी समाजाचे लोक मोठ्या संख्येने जेजुरी गडावर खंडोबाच्या दर्शनास गेले आहेत. किमान एक सप्ताह तरी देव दर्शनास व सर्व विधी पूर्ण होण्यास लागणार आहे. देवदर्शन आटपून आल्यावरच सर्व होड्या मच्छिमारी करण्यास जाणार आहेत. मासळीची आवक वाढल्यास मासळीचे दर निश्चितच खाली येतील.**

**–मनोहर बैले, चेअरमन,** रायगड जिल्हा मच्छिमार संघाचे उपाध्यक्ष सागर कन्या मच्छिमार संघ

# माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचा वर्धापन दिन उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

सहकार क्षेत्रात रायगड जिल्ह्यात अग्रगण्य असणाऱ्या माणगाव शहरातील माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.,उतेखोल ता.माणगाव या पतसंस्थेचा रौप्य महोत्सवी वर्धापन दिन सोहळा रविवारी (दि.१) संस्था कार्यालय चौधरी कॉम्प्लेक्स माणगाव याठिकाणी उत्साहात साजरा करण्यात आला.

संस्थेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या हळदी – कुंकू कार्यक्रमास हजारोंच्या संख्येने महिलांनी उपस्थित राहून हळदी – कुंकू कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटून पतसंस्थेच्या या कार्यक्रमाचे विशेष कौतुक केले.

माणगाव ग्रामीण पतसंस्थेत दरवर्षी उत्साहात वर्धापन दिन साजरा केला जातो. वर्धापनदिनानिमित्त सत्यनारायणाची महापूजा संस्थेतर्फे आयोजित करण्यात आली होती. तसेच महिलांसाठी हळदी – कुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता. या हळदी – कुंकू समारंभात हजारोंच्या संख्येने महिला सहभागी झाल्या होत्या. सायंकाळी ५ वाजल्यापासून रात्री ८ वाजेपर्यंत महिलांची हळदी–कुंकू कार्यक्रमासाठी मोठी गर्दी होती. हळदी–कुंकू समारंभास महिलांची रांगच रांग लागली होती. सत्यनारायणाच्या महापूजेलाही नागरिकांची मोठी गर्दी होती. संस्थेच्या भागधारक, खातेदार, हितचिंतक व मित्रपरिवार यांच्यासह माणगावकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत तीर्थप्रसादाचा लाभ घेतला. संस्थेचे चेअरमन आनंद यादव व सहकाऱ्यांनी आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

वर्धापन दिनाचा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी संस्थेचे चेअरमन आनंद यादव, व्हाईस चेअरमन मदनलाल जैन सर्व संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली पतसंस्थेचे व्यवस्थापक पुंडलिक गायकवाड, सर्व कर्मचारी वृंद व स्वल्पबचत प्रतिनिधी यांनी परिश्रम घेतले.




# रानावनात शिशिराची पानगळ : पळस, चाफा फुलांना बहर आणि वसंताची चाहूल!

**माणगाव : प्रतिनिधी**

वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत, शिशिर हे भारतीय ऋतू निसर्गातील विविध बदलांची नांदी देतात. बारा महिन्यातील विभागून ऋतूचक्र सांगणारे हे ऋतू निसर्गाची विविध रूपे समोर आणतात. हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे मार्गशिर्ष आणि पौष या महिन्यात शिशिर ऋतू असतो.

म्हणजेच डिसेंबर महिन्याचा उत्तरार्ध, जानेवारी महिना व फेब्रुवारी महिन्याच्या पूर्वार्धात शिशिर ऋतू असतो. या ऋतूचे वैशिष्टय म्हणजे 'झाडांची पानगळ' झाडांची पानगळ सुरू झाली कि शिशिर ऋतू सुरू झाला असा जनमानसात समज आहे. यावर्षी मात्र नोव्हेंबर महिन्याच्या ८ तारखेपर्यंत लांबलेल्या पावसाने निसर्गाचे चक्र पूर्णपणे बदलवून टाकले होते. मात्र ठराविक काळानंतर येणारे ऋतूचक्र सतत सुरू असून शिशिर ऋतूने पानगळीला सुरूवात केली आहे.

मोठया पानांच्या झाडांची पाने या ऋतूत गळतात. झाडे पूर्णपणे निष्पर्ण होतात. काहीसं भकास उदास असं



माळरानाचं चित्र या ऋतूत दिसून येते. निसर्गाला नवे रूप देणारा हा ऋतू शेती आणि शेतकऱ्यांच्या दृष्टीनेही महत्वाचा मानला जातो. जानेवारी फेब्रुवारी महीन्यात असणारा हा ऋतू थंडीचा ऋतू म्हणूनही ओळखला जातो. शिशिराची पानगळ झाली असून झाडांची पाने पिवळीगर्द होवून गळण्यास सुरूवात झाली आहे. काहीसा उदास वाटणारा हा ऋतू गारावा थंडी आणि पानगळ घेऊन येतो. या ऋतूतील सणही ऋतूमानाचा विचार करून आहार विहार देतात.

मकरसंक्रात हा त्यातीलच महत्वाचा सण. उत्तम आरोग्यासाठी स्निग्ध पदार्थ खाण्याचा, थंडीचे कपडे, हलका व्यायाम आणि आरोग्यदायी आहार सांभाळून या ऋतूत आरोग्याची काळजी घेतली जाते. झाडांची झालेली पानगळ शेतकऱ्यांनाराब देवून जाते. झाडांचा गळलेला हाच पालापाचोळा शेतकरी शेतीसाठी वापरतात. निसर्गाला नवे अंकूर देणारा 'जूनं जाऊ द्या मरणालागूनी' म्हणणारा हा ऋतू वसंताची चाहूल देतो. निष्पर्ण झालेल्या फांदीतून रंगीबेरंगी फुलांचे गुच्छ याच ऋतूच्या अखेरीस पहावयास मिळतात. एका अर्थाने नवसर्जनास पार्श्वभूमी निर्माण करणारा विरक्तीचा संदेश देणारा हा ऋतू वसंताची चाहूल देतो.

या ऋतूतच रानोमाळ आंब्याच्या, काजूच्या मोहोराचा घमघमाट येत राहतो. करवंदीच्या जाळीमधून पांढरीशूभ्र फुले डोकावतात आणि पांगिरा, फळस, चाफा इ. असंख्य झाडे पुष्पगुच्छांची बरसात करतात.

या ऋतूच्या उत्तरार्धात सुरू होतो तो सृष्टीचे नवचैतन्य बहरणारा वसंत ऋतू. सध्या मात्र रानावनात मोठ्या प्रमाणात पळस, करवंद आदी फुलांना मोठ्या प्रमाणात बहर येत आहे. हे दृश्य अतिशय सुंदर दिसत असून निसर्गाच्या या रूपाचे आगळेवेगळे रूप निसर्ग प्रेमींना सुखावत आहे.

# युवा भारताचा शानदार विजय

## अंडर-१९ वर्ल्डकपमध्ये पाकिस्तानला हरवले

**बुलावायो : वृत्तसंस्था**

१९ वर्षाखालील विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने पारंपरिक कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानला 'सुपर सिक्स' सामन्यात हरवले आहे. चुरशीच्या झालेल्या या सामन्यात भारताने पाकिस्तानवर ५८ धावांनी मात करत दिमाखदार विजय मिळवला. यासह भारतीय संघ आता अफगाणिस्तानविरूद्ध सेमीफायनल सामना खेळणार आहे.



२५३ धावांचे लक्ष्य घेऊन मैदानात उतरलेल्या पाकिस्तानची सुरुवात खराब झाली. सलामीवीर समीर मिन्हासला (९) हेनिल पटेलने स्वस्तात बाद करून भारताला पहिले यश मिळवून दिले. त्यानंतर हमजा झहूर (४२) आणि उस्मान खान (६६) यांनी ६५ धावांची भागीदारी करून डाव सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र भारतीय गोलंदाजांनी ठराविक अंतराने बळी घेत पाकिस्तानवर दडपण कायम ठेवले. उस्मान खानने झुंजार अर्धशतक झळकावले, तरी त्याला दुसऱ्या टोकाकडून अपेक्षित साथ मिळाली नाही.

भारतीय गोलंदाजीचे नेतृत्व करताना कर्णधार आयुष म्हात्रेने अत्यंत टिच्चून मारा केला. त्याने आठ षटकांत अवघ्या २१ धावा देत तीन मोलाचे गडी बाद केले. त्याला खिलन पटेलने योग्य साथ दिली. खिलनने ९.२ षटकांत ३५ धावांच्या मोबदल्यात तीन बळी मिळवत पाकिस्तानच्या तळाच्या फलंदाजांना फार काळ टिकू दिले नाही. फिरकीपटू विहान मल्होत्रा आणि वेगवान गोलंदाज कनिष्क चव्हाण, हेनिल पटेल यांनी प्रत्येकी एक बळी घेऊन विजयात योगदान दिले.

एका क्षणी पाकिस्तानची स्थिती ३ बाद १५१ अशी मजबूत होती. त्या वेळी कर्णधार आयुष म्हात्रेने अहमद हुसेनला पहिल्याच चेंडूवर बाद केले आणि तिथून पाकिस्तानच्या डावाला गळती लागली. शेवटच्या सात विकेट्स पाकिस्तानने अवघ्या ४३ धावांत गमावल्या. अली हसन बलोच (३) आणि हुझैफा अहसान (१४) यांच्यासारखे फलंदाज भारतीय माऱ्यासमोर सपशेल अपयशी ठरले.

तत्पूर्वी सुरुवातीच्या पडझडीनंतर वेदांत त्रिवेदीने (६८) सावरलेला डाव आणि शेवटच्या षटकांमध्ये कनिष्क चव्हाण व खिलन पटेल यांनी केलेली फटकेबाजी यांच्या जोरावर भारताने ४९.५ षटकांत २५२ धावांपर्यंत मजल मारली होती. पाकिस्तानकडून अब्दुल सुभानने अत्यंत किफायतशीर गोलंदाजी करत ३३ धावांत तीन बळी टिपले.




# रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात

■ मान्यवरांची उपस्थिती; विजेत्यांचा गौरव

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथील प्रशस्त क्रीडांगणावर १५वा वार्षिक क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. या वेळी संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन भाजपचे रायगड जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल यांच्या हस्ते झाले. प्रारंभी क्रीडा ध्वज फडकावणे, बॅटन टॉर्च रिले, क्रीडा शपथविधी झाला.

महोत्सवास संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सदस्य वर्षा ठाकूर, राहुल घरत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, नगरसेविका परेशा पटेल, प्राचार्य राज अलोनी उपस्थित होते.

या महोत्सवात मुला-मुलींच्या विविध क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात ॲथलेटिक्स, धावणे, रिले शर्यती, रस्सीखेच यासह टिचर्स, माजी विद्यार्थी व पालकांचीही लेमन अँड स्पून बूक बॅलेन्स शर्यत घेण्यात आली.

सायंकाळी मुख्य अतिथींचे आगमन झाल्यानंतर कराटे, जिम्नॅस्टिक्स, मास पीटी, लेझीम, दुपट्टा ड्रिल, झुंबा नृत्य, पिरॅमिड योगा, मार्च-पास्ट अशा रंगतदार सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली.

पाहुण्यांच्या हस्ते पूर्व-प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विभागातील क्रीडा स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. शिस्तबद्ध आयोजन, विद्यार्थ्यांचा उत्साह व पालकांचा सहभाग यामुळे हा क्रीडा महोत्सव यशस्वी व संस्मरणीय ठरला.



# खारघरच्या आभा सोमणला ट्रॅक एशिया कपमध्ये दुहेरी सुवर्णपदक

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमधील उदयोन्मुख सायकलपटू आभा सोमण हिने चेन्नई येथे नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय ट्रॅक एशिया कप स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.



१७ वर्षीय आभाने जिद्द आणि वेग दाखवत भारताचे प्रतिनिधित्व केले. तिने टीम स्प्रिंट प्रकारात सुवर्णपदक, तर वैयक्तिक २०० मीटर स्प्रिंटमध्ये रौप्यपदक पटकावले.

आभा गेल्या तीन वर्षांपासून पुण्यातील फिनिक्स सायकलिंग अकॅडमीमध्ये प्रशिक्षक दर्शन बारगुजे यांच्या प्रशिक्षणखाली सराव करत आहे. या आंतरराष्ट्रीय यशापूर्वी तिने विविध राष्ट्रीय स्पर्धांमध्ये १० पदके जिंकून भारतीय ट्रॅक सायकलिंगमध्ये आपला ठसा उमटवला आहे. अलीकडेच चेन्नई येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत आभाने पुन्हा एकदा ट्रॅकवर आपली गुणवत्ता सिद्ध केली असून तिच्या या यशामुळे नव्या पिढीतील अनेक इच्छुक खेळाडूंनाही प्रेरणा मिळत आहे.

# पाकच्या बहिष्काराच्या निर्णयाची गावसकरांनी उडवली खिल्ली

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि पाकिस्तान यांच्यात टी-२० विश्वचषक स्पर्धेत १५ फेब्रुवारीला सामना होणार होता, पण पाकिस्तानने सामन्यावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. यावरून लिटल मास्टर सुनील गावसकर यांनी पाकिस्तानची खिल्ली उडवली आहे.

गावसकर म्हणाले की, पाकिस्तान त्यांच्या निवृत्त खेळाडूंप्रमाणेच या मुद्द्यावरही यू-टर्न घेऊ शकतो. पाकिस्तानी खेळाडूंनी अनेकदा निवृत्ती जाहीर केली आणि नंतर त्या निर्णयावरून यू टर्न घेतला आहे. आताचा प्रकारही तसाच असेल. जगभरातून आणि त्यांच्या माजी खेळाडूंकडून प्रतिक्रिया येतील, तेव्हा पाकिस्तान आपली भूमिका बदलू शकेल.

# रसायनीतील संगीता पांगतला पॉवरलिफ्टिंगमध्ये 'सुवर्ण'

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडच्या वतीने जिल्हास्तरीय क्लासिक स्पर्धेचे आयोजन नवीन पनवेल येथे करण्यात आले होते. यात महिला खुल्या गटात मास्टर वनमध्ये मोहोपाडा आळी आंबिवली येथील संगीता मिलिंद पांगत यांनी सुवर्णपदक पटकाविले.




स्पर्धेस जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, महाराष्ट्र पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव संजय सरदेसाई, राष्ट्रीय पंच संजय माधव, अनंत चाळके, पॉवरलिफ्टिंग जिल्हा अध्यक्ष गिरीश वेदक, पंकज संगती, राजाराम गोळे, यशवंत मोकल आदी उपस्थित होते.

संगीता पांगत या शाळांमध्ये तसेच परिसरातील महिलांना योगासनांचे प्रशिक्षण देतात. त्यांना याअगोदरही विविध क्रीडा खेळात गौरविण्यात आले आहे. पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदक मिळाल्याने त्यांचे अभिनंदन होत आहे.

# पाकिस्तान टी-२० वर्ल्डकप सामना न खेळल्यास भारताला मिळणार गुण

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टी-२० वर्ल्डकप सध्या चर्चेत आहे. भारत आणि श्रीलंका येथे ७ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या या स्पर्धेत पाकिस्तानला सहभागी होण्याची अधिकृत परवानगी मिळाली असली, तरी भारत-पाकिस्तान सामन्याबाबत मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. पाकिस्तानने भारताविरुद्धचा ग्रुप स्टेज सामना न खेळण्याचा निर्णय घेतल्यामुळे क्रिकेटविश्वात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे.



१५ फेब्रुवारी रोजी कोलंबो येथे होणारा भारत-पाकिस्तान ग्रुप स्टेज सामना खेळला जाणार नाही, असा निर्णय पाकिस्तान सरकारकडून घेण्यात आला आहे. या निर्णयाचा थेट फायदा भारताला होणार असून नियमांनुसार भारताला वॉकओव्हरच्या माध्यमातून दोन गुण मिळणार आहेत. टी-२०च्या स्पर्धेत हे दोन गुण अतिशय महत्त्वाचे ठरू शकतात.

या संपूर्ण वादामागे सुरक्षा आणि राजकीय संवेदनशीलता हे प्रमुख कारण असल्याचे सांगितले जात आहे. याआधी झालेल्या काही आंतरराष्ट्रीय वादानंतर आणि आयसीसीवर लावण्यात आलेल्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानने हा निर्णय घेतल्याचे मानले जाते. गेल्या वर्षी झालेल्या चर्चांमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात आयसीसी स्पर्धांदरम्यान एकमेकांच्या देशात न जाण्याबाबत सहमती झाली होती आणि सामने तटस्थ ठिकाणी खेळवण्यावर भर देण्यात आला होता.

याच मुद्द्यावरून पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसिन नकवी आणि पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांच्यात झालेल्या बैठकीनंतर भारताविरुद्धचा ग्रुप स्टेज सामना न खेळण्याचा निर्णय घेण्यात आला.

स्पर्धेतील सर्वात मोठा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. जर भारत आणि पाकिस्तान सेमीफायनल किंवा फायनलमध्ये आमने-सामने आले, तर नेमके काय होणार? या संदर्भात आयसीसी किंवा पाकिस्तान क्रिकेट बोर्डाकडून अजून कोणतेही उत्तर आले नाही.

### पाकची पुढची वाटचाल कठीण

भारताविरुद्ध सामना न खेळल्याचा सर्वात मोठा फटका पाकिस्तानलाच बसू शकतो. ग्रुप स्टेजमधून पुढे जाण्यासाठी फक्त पहिले तीन संघच पात्र ठरणार आहेत. अशा परिस्थितीत पाकिस्तानला अमेरिका, नेदरलँड्स आणि नामीबिया यांच्याविरुद्धचे सर्व सामने जिंकणे अनिवार्य आहे. केवळ विजयच नव्हे, तर नेट रनरेटही पाकिस्तानसाठी निर्णायक ठरू शकतो. पावसामुळे एखादा सामना रद्द झाला किंवा एखाद्या दिवशी सामना काही कारणास्तव रद्द झाला, तर पाकिस्तानचे आव्हान धोक्यात येऊ शकते.



# राष्ट्रीय मास्टर्स स्पर्धेत समाधान कणेकरची पदकांची हॅट्ट्रिक

**उरण : बातमीदार**

नाशिक येथे नुकत्याच झालेल्या पहिल्या संयुक्त राष्ट्रीय मास्टर्स स्पर्धेत उरणचे सुपुत्र समाधान कणेकर यांनी नेत्रदीपक कामगिरी केली आहे. त्यांनी ३५ वर्षांवरील पुरुष गटात ४०० मीटर हर्डल्समधे सुवर्ण, १५०० मीटर धावणेमध्ये रौप्य तसेच २०० मीटर धावणेमध्ये कांस्यपदक पटकाविले.

समाधान कणेकर यांनी सुरुवातीच्या कारकिर्दीत २००८- ०९मध्ये युनिव्हर्सिटीतर्फे १२.५ किमी क्रॉस कन्ट्री स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. त्यानंतर तालुकास्तरीय छोट्या छोट्या स्पर्धांमध्ये भाग घेतला. खडतर प्रवास करत ते २०१८मध्ये पीपीएम स्कूल वेश्वी येथे क्रिडा शिक्षक म्हणून रूजू झाले. आता त्यांनी राष्ट्रीय स्पर्धेत चमकदार कामगिरी केली असून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# ऑस्ट्रेलियाचा हेजलवूड सुरुवातीच्या वर्ल्डकप सामन्यांना मुकण्याची शक्यता

**सिडनी : वृत्तसंस्था**

भारत-श्रीलंका यांच्या यजमानपदाखाली रंगणाऱ्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेआधी पाकिस्तानच्या मैदानात ऑस्ट्रेलियन संघाने तीन सामन्यांची टी-२० मालिका ०-३ अशी गमावली. या लाजिरवाण्या कामगिरीनंतर आता संघाला आणखी एक धक्का बसला आहे. दुखापतग्रस्त प्रमुख जलदगती गोलंदाज जोश हेजलवूड ७ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील सुरुवातीच्या लढतींना मुकण्याची शक्यता आहे.



टी-२० वर्ल्डकप स्पर्धेआधी ऑस्ट्रेलियन संघाला धक्क्यावर धक्के बसल्याचे पहायला मिळाले आहे. मिचेल स्टार्कच्या निवृत्तीने त्याची उणीव कोण भरून काढणार असा मोठा प्रश्न ऑस्ट्रेलियन संघासमोर निर्माण झाला होता. त्यात पॅट कमिन्सची भर पडली. दुखापतीमुळे तो टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतून बाहेर पडला. आता हेजलवूडच्या अनुपस्थितीने ऑस्ट्रेलियाला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. ऑस्ट्रेलियन राष्ट्रीय निवड समितीचे सदस्य टोनी डोडेमाईड यांनी दिलेल्या माहितीनुसार सोमवारी कोलंबो येथे संघात सहभागी होणार असलेला हेजलवूड सध्या सिडनीतच थांबला असून तिथेच पुनर्वसन प्रक्रिया सुरू ठेवणार आहे.

जोश हेजलवूड ॲशेस मालिकेतून बाहेर पडल्यानंतर तो टी-२० वर्ल्डकप मोहिमेसाठी तयार असेल असा विश्वास व्यक्त करण्यात आला होता. हेजलवूडला हॅमस्ट्रिंग स्ट्रेनमुळे इंग्लंडविरुद्धच्या मालिकेच्या सुरुवातीलाच बाहेर पडावे लागले होते. त्यानंतर पुनर्वसनादरम्यान त्यांना ॲकिलीसची समस्या उद्‌भवली. त्यामुळे ऑस्ट्रेलियाचे निवडकर्ते आणि वैद्यकीय पथकाने निर्णय घेतला आहे की, हेजलवूड सध्या सिडनीतच राहून पुनर्वसन सुरू ठेवेल. निवडकर्ता टोनी डोडेमाईड यांनी मात्र हेजलवूड श्रीलंकेत नेमका कधी दाखल होईल याबाबत कोणतीही ठोस माहिती दिलेली नाही.

# दिल्लीची सलग चौथ्यांदा प्लेऑफमध्ये धडक

**वडोदरा : वृत्तसंस्था**

दिल्ली कॅपिटल्सने युपी वॉरियर्स संघावर पाच विकेट्सने दणदणीत विजय मिळवत प्लेऑफमध्ये धडक मारली आहे. दिल्लीने सामना जिंकल्यामुळे मुंबई इंडियन्स स्पर्धेतून बाहेर झाली आहे. युपी संघाने या सामन्यात विजय मिळवला असता तर नेट रनरेटच्या बळावर मुंबई इंडियन्सला प्लेऑफ गाठण्याची अखेरची संधी होती, पण दिल्लीने युपीचा पराभव केला असून संघ आता एलिमिनेटर खेळणार आहे.



दिल्लीने सुरुवात चांगली केली, पण लागोपाठ विकेट्स गमावल्यानंतर पुन्हा एकदा अखेरच्या षटकांमध्ये पोहचली. दिल्लीला विजयासाठी २४ चेंडूत २३ धावांची गरज होती. तेव्हा चिनेल हेन्री १७व्या षटकातझेलबाद झाली. जेमिमाने अखेरच्या चेंडूवर चौकार मारत दबाव कमी केला. पुढच्या षटकातही जेमिमाने चौकार लगावला आणि शक्य तिथे डबल आणि सिंगल घेत संघाला विजयाच्या जवळ नेले. त्यानंतर जेमिमाने १९व्या षटकात दोन चौकार लगावल्यावर सलग चौथ्यांदा प्लेऑफ गाठल्याचे निश्चित झाले.

### युपीच्या पराभवामुळे मुंबई डब्ल्यूपीएल २०२६ स्पर्धेबाहेर

१२३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना लिझेल ली १० धावा करत लवकर बाद झाली. यांनतर शफाली वर्मा व लॉरा वोल्व्हार्ड यांनी दिल्लीचा डाव सावरला. शफाली ३३ चेंडूत दोन चौकारांसह २९ धावा करत बाद झाली. तर लॉरा सात चौकारांसह ४७ धावांवर बाद झाल्याने तिचे अर्धशतक हुकले, तर मारिजान काप शून्यावर व चिनेल हेन्री १ धाव करत बाद झाली, ज्यामुळे दिल्लीचा संघ पुन्हा संकटात सापडला, पण कर्णधार जेमिमा रॉड्रीग्जने मात्र या सामन्यात कोणतीही चूक न करता संघाला विजय मिळवून देत माघारी परतली.

त्याआधी दिल्लीने सामन्याची नाणेफेक जिंकत युपीला फलंदाजीसाठी पाचारण केले, पण दिल्लीच्या गोलंदाजीपुढे युपीचा संघ फक्त १२२ धावा करू शकला. चिनेल हेन्रीने पहिल्याच चेंडूवर मेग लॅनिंगला पायचीत करत संघाला ब्रेकथ्रू मिळवून दिला आणि इथूनच दिल्लीने विकेट्स घ्यायला सुरुवात केली. युपीकडून दीप्ती शर्माने सर्वाधिक २४ धावा केल्या, तर दिल्लीकडून मारिजन कापने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या.

# फुटबॉल सामन्यात डब्ल्यूडब्ल्यूईची झलक

**दोहा : वृत्तसंस्था**

कतारमध्ये पार पडलेल्या 'मॅच फॉर होप' या धर्मादाय फुटबॉल सामन्यातील एक मजेशीर प्रसंग सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. फुटबॉलच्या मैदानात अचानक 'डब्ल्यूडब्ल्यूई'चा थरार पाहायला मिळाल्याने चाहते थक्क झाले आहेत.



ही मॅच खरंतर डब्ल्यूडब्ल्यूई कुस्तीच्या रिंगमधील नव्हती, तर कतारमध्ये धर्मादाय फुटबॉलची होती. या सामन्यात जगभरातील दिग्गज कंटेंट क्रिएटर्स आणि फुटबॉल स्टार्स सहभागी झाले होते, मात्र संपूर्ण सामन्यात सर्वात जास्त चर्चा रंगली ती म्हणजे प्रसिद्ध ब्रिटीश युट्यूबर केएसआय आणि अरब क्रिएटर बिलाल फदिली (अबोफ्ला) यांच्यातील डब्ल्यूडब्ल्यूई कुस्तीची!

सामना रंगात आलेला असताना युट्यूबर केएसआय चेंडू आपल्या ताब्यात घेऊन गोलच्या दिशेने वेगाने पुढे सरकत होता. तितक्यात प्रतिस्पर्धी संघातील बिलाल फदिली (अबोफ्ला) याने त्याला रोखण्यासाठी फुटबॉलचे सर्व नियम बाजूला सारले. अबोफ्लाने चेंडूकडे लक्ष न देता थेट केएसआयच्या अंगावर धाव घेतली आणि एखाद्या प्रो-रेसलरप्रमाणे त्याच्या खांद्यावर उडी मारली.

केएसआयला अबोफ्लाने कवेत घेऊन जमिनीवर पाडले, ते दृश्य पाहून स्टेडियममधील प्रेक्षक आणि कॉमेंटेटर्सना डब्ल्यूडब्ल्यूई स्मॅकडाउनमधील एखाद्या फाईटची आठवण झाली. हा 'टॅकल' इतका अनपेक्षित आणि मजेशीर होता की स्वतः केएसआय आणि अबोफ्लादेखील हसायला लागले. त्याचप्रमाणे यामुळे प्रेक्षकांचे चांगलेच मनोरंजन झाले. या घटनेनंतर हा फुटबॉल सामना आहे की रेसलिंग मॅनिया?, अबोफ्लाला पुढच्या डब्ल्यूडब्ल्यूई ड्राफ्टमध्ये स्थान मिळायला हवे, अशा मजेशीर कमेंट्स युजर्स करत आहेत.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com